follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

ठख्ख ठशसव छे.७२१०५/९९ ✻ वर्ष २५ ✻ अंक २९७ सातारा ✻ सोमवार दि २२ जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# निर्मला सीतारमण यांचं ‘बजेट’ ठरणार ऐतिहासिक

**दिल्ली** :२३ जुलै सादर होणाऱ्या अर्थसंकल्पापूर्वी आज देशाचा आर्थिक सर्व्हेक्षण अहवाल लोकसभेत सादर केला जाणार आहे. यामध्ये केंद्र सरकारचा मागील आर्थिक वर्षाच्या कामकाजाचा लेखाजोखा मांडला जाणार आहे. ज्यामुळे आता सरकारचे मागील आर्थिक वर्षातील रिपोर्ट कार्ड उद्या सर्वांसमोर येणार आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण २३ जुलै रोजी अर्थसंकल्प सादर करतील. त्याअगोदर एक दिवस आधी आज २२ जुलै रोजी म्हणजे आर्थिक सर्व्हेक्षण अहवाल सादर होईल. ही अर्थसंकल्पाची एक महत्वपूर्ण परंपरा आहे. आर्थिक सर्वेक्षण हे एक प्रकारे सरकारचा रिपोर्ट कार्ड आहे. यामध्ये गेल्या आर्थिक वर्षाच्या कामकाजाची उजळणी करण्यात येते. त्याची समीक्षा करण्यात येते. सरकारच्या विकास योजनांचा किती आणि कसा



परिणाम झाला याची समीक्षा या माध्यमातून करण्यात येते.

**आर्थिक सर्वेक्षणात काय असते खास?**

आर्थिक सर्वे देशातील अर्थव्यवस्थेची पूर्ण चित्र स्पष्ट करतो. यामध्ये अर्थव्यवस्थेची स्थिती, संभावना आणि धोरणांचा संपूर्ण लेखा जोखा असतो. आर्थिक सर्व्हेक्षण अहवालामध्ये गेल्या आर्थिक वर्षांतील सर्वच क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेण्यात येतो. रोजगार, जीडीपी, महागाई, वित्तीय तूट आदींची माहिति देण्यात येते. याविषयीची आकडेवारीच सादर करण्यात येते. यावेळी आर्थिक सर्व्हेक्षण अहवाल मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांच्या नेतृत्वाखालील टीम सादर करणार आहे.

**दोन भागात आर्थिक सर्व्हेक्षण**

आर्थिक सर्व्हेक्षण हा अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असतो. आर्थिक सर्व्हेक्षणात सरकारची नीती, प्रमूख आर्थिक आकडेवारी, क्षेत्रानुसार आर्थिक अंदाज यांची विस्तारपूर्वक माहिती दिली असते. तर दुसऱ्या भागात विविध क्षेत्रातील आकडेवारी सादर करण्यात येते. त्याआधारे कोणत्या क्षेत्रात काय प्रगती साधण्यात आली आणि सध्या काही स्थिती आहे, त्याची माहिती देण्यात येते. अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी एक दिवस अगोदर आर्थिक सर्वे क्षण सादर केले जाते. अर्थविभाग आर्थिक सर्वेक्षण तयार करतो. अर्थ खात्यातंर्गत अर्थविभाग आर्थिक सर्वेक्षण करते. मुख्य आर्थिक सल्लागारांचे या प्रक्रियेवर बारीक लक्ष असते.


**१९६४ पासून आहे परंपरा**

आर्थिक सर्वेक्षणातून देशाची आर्थिक स्थिती सध्या कशी आहे. पुढे देशाच्या विकासाचा दर काय असू शकतो? याचा अंदाज आर्थिक सर्वेक्षणातून मांडण्यात येतो. आर्थिक सर्वेक्षण १९६४ पासून अर्थसंकल्पासोबतच सादर करण्यात येते. मात्र, आर्थिक सर्वेक्षण हे अर्थसंकल्पाच्या एक दिवस अगोदर सादर करण्यात येते. यावेळी २२ जुलै रोजी आर्थिक सर्वेक्षण सादर करण्यात येणार आहे.

# केदारनाथ पादचारी मार्गावर भीषण अपघात

## डोंगरावरून ढिगारा पडला अन् तीन प्रवाशांचा मृत्यू; पाच जखमी





**दिल्ली** : गौरीकुंड-केदारनाथ पादचारी मार्गावर रविवारी सकाळी मोठा अपघात झाला. चिरबासाजवळील टेकडीवरून अचानक मोठ्या प्रमाणात मातीचा ढिगारा आणि दगड पडले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नंदन सिंह राजवार यांनी सांगितले की, या अपघातात यात्रेला जाणाऱ्या तीन भाविकांचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले. जखमींमध्ये दोन प्रवासी महाराष्ट्रातील तर इतर स्थानिक असल्याचे सांगण्यात येत आहे. जखमींना उपचारासाठी गरिकुंड रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना रविवारी, सकाळी ७.३० वाजता घडल्याचे सांगण्यात येत आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. किशोर अरुण पराते (३१, रा. नागपूर महाराष्ट्र), सुनील महादेव काळे (२४, रा. जालना महाराष्ट्र), अनुराग बिश्त, तिलवाडा रुद्रप्रयाग अशी अपघातातील मृतांची नावे आहेत.

केदारनाथमधील १६ किमी लांबीच्या गौरीकुंड-केदारनाथ चालण्याच्या मार्गावर दरवेळी दरड कोसळण्याचा धोका आहे. चिरबासा हा भूस्खलन क्षेत्र आहे, जेथे दर पावसाळ्यात डोंगरावरून दगड पडल्याने अपघात होतात. येथे गेल्या वर्षीही डोंगरावरून दरड कोसळल्याने एका व्यक्तीला आपला जीव गमवावा लागला होता. केदारनाथ यात्रा मार्गावर झालेल्या दुर्घटनेबद्दल सीएम धामी यांनी शोक व्यक्त केला आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी लिहिले की, ‘टेकडीवरून ढिगारा आणि मोठमोठे दगड पडल्याने काही प्रवासी जखमी झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. अपघातात जखमी झालेल्यांना तातडीने चांगले उपचार देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# रायगड जिल्ह्यात घराचे छत कोसळले; दुर्घटनेत अडीच वर्षीय चिमुरडा जखमी



**रायगड** : जिल्ह्याच्या सुधागड तालुक्यातील भोप्याचीवाडी आदिवासीवाडीमध्ये घराची भिंत आणि छत कोसळली आहे. या दुर्घटनेत अडीच वर्षाच्या बालकाचा हात भाजला आहे. सुदैवाने कोणतीही जीवित हानी नाही झाली.

रविवारी, कोकणात सर्वत्र मुसळधार पाऊस पडला. रायगड, ठाणे तसेच मुंबई परिसरात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता.

अंदाजाप्रमाणे, तसा पाऊसही झाला. या मुसळधार पाऊसात मुंबईत ठिकठिकाणी पाणीदेखील भरले. कोकणात नदी-नाले ओसंडून भरून वाहू लागले. यात रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात दुर्घटना घडली आहे.

अतिमुसळधार पावसामुळे तसेच वादळी वाऱ्यामुळे पाली येथे एका कौलारू घराची भिंत आणि छत कोसळले आहे. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झालेली नाही. परंतु, या दुर्घटनेत अडीच वर्षाच्या चिमुरड्याने हात भाजले गेले आहे.

# म्हणून राज्यातील शिंदे सरकारची वाढली आता डोकेदुखी



**अहमदनगर** : छत्रपती संभाजीनगर, धाराशिवनंतर आता अहमदनगर शहराच्या नामांतराचा वादही कोर्टात गेला आहे. अहमदनगर शहराचे नामांतर अहिल्यानगर करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. २५ जुलैला याबाबत सुनावणी होणार आहे. यामुळे आता शिंदे सरकारची डोकेदुखी वाढली आहे.

औरंगाबाद शहराचे नामांतर छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे नामांतर धाराशिव केल्यानंतर राज्यातील महायुती सरकारने अहमदनगर शहराचेही नामांतर अहिल्यानगर करण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते. राज्य सरकारने या नामांतरास मंजुरी दिली असली तरी अद्याप केंद्र सरकारची मान्यता घेणे गरजेचे आहे. अहमदनगरचे नामांतर अहिल्यानगर करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे.

माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, अर्शद शेख आणि पुष्कर सोहोनी यांनी ही याचिका दाखल केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान असलेल्या अहमदनगर येथील चौंडी येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहिल्यानगर नावाची घोषणा केली होती.



# नृसिंहवाडीतील दत्त मंदिरात दुसरा दक्षिणद्वार सोहळा

## भाविकांनी केले पवित्र स्नान

**कोल्हापूर :** नृसिंहवाडीतील दत्त मंदिरात दुसरा दक्षिणद्वार सोहळा; भाविकांनी केले पवित्र स्नान (छायाचित्र - लोकसत्ता टीम)



कोल्हापूर : संततधार पावसामुळे कृष्णा पंचगंगा नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने नृसिंहवाडी येथील दत्त मंदिरात शनिवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास या मोसमातील दुसरा दक्षिण द्वार सोहळा संपन्न झाला. गुरुपौर्णिमेच्या पूर्व संध्येलाच हा सोहळा झाल्याने शेकडो भाविकांनी येथे पवित्र स्नानाचा लाभ घेतला.

गेल्या २४ तासात कृष्णा पंचगंगा नदीच्या पाण्याच्या पातळीत सुमारे सहा फूट वाढ झाली आहे. कृष्णाचे पुराचे पाणी दत्त मंदिराच्या उत्तर द्वारातून श्रींच्या मुख्य चरण कमलावरून दक्षिण दारातून बाहेर पडले. या दक्षिण द्वार सोहळ्याला अनेक भाविकांनी हजेरी लावून पवित्र स्नानाचा लाभ घेतला. उद्या रविवारी गुरुपौर्णिमा साजरी होत असल्याने व दक्षिण द्वार झाल्याची माहिती वाऱ्यासारखी पसरल्याने शेकडो भाविकांनी येथे पवित्र स्नानाचा लाभ घेतला. दत्त देव संस्थांमार्फत रोप ब्रॅकेटची व्यवस्था केल्याने भाविकांना सुलभपणे स्नान करता आले. दुपारी अडीचनंतर पाण्याची पातळी वाढत गेली.



# राधानगरी धरण काठोकाठ

**कोल्हापूर :** पाऊस - रविवार समीकरण कायम; कोल्हापूर : रविवार आणि पाऊस हे समीकरण आजही कायम राहिले गेले. जिल्ह्यात पाणलोट क्षेत्रामध्ये धुवाधार पाऊस पडत आहे. राधानगरी धरण भरण्यास १० फूट अंतर राहिले असल्याने नद्यांना पूर येण्याची शक्यता आहे. जिल्हा प्रशासनाने आज सायंकाळी अतिदक्षतेचा इशारा दिला होता.

कोल्हापूर जिल्ह्यात पावसाचा जोर आजही कायम राहिला. पावसाची संततधार सुरू असल्याने सलग तिसऱ्या रविवारी कोल्हापूरकरांना घरातच दिवस घालवावा लागला. पंचगंगा नदीच्या पाणी पातळीमध्ये वाढ होऊ लागली आहे. राजाराम बंधाऱ्यांमध्ये ३७ फूट पाणी पातळी झाली असून ती इशारा पातळीस दोन फूट अंतर राहिले आहे. इचलकरंजी येथे पंचगंगा नदीची पाणी पातळी सायंकाळी ६१ फूट ५ इंच होती. धोका पातळी ७१ फूट आहे.

दरम्यान राधानगरी धरणातही पाणीसाठा वाढत चालला आहे. येथे पाणी पातळी ३३८ फूट होती. ३४७ फूट पाणी पातळी झाल्यानंतर धरण पूर्ण क्षमतेने भरते. आणखी दहा फूट पाणी पातळी वाढल्यास एखादा दरवाजा उघडण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील ७९ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

शाहूवाडी तालुक्यात सर्वाधिक ५८ मिमी पाऊस पडला. याशिवाय पन्हाळा २९, राधानगरी २९.४, गगनबावडा ३५.६ ,भुदरगड ४१.४, आजारा ४१, चंदगड ३६ मिमी येथेही जोरदार पाऊस झाला. जिल्ह्यातील सर्वच नद्यांच्या पाणी पातळीमध्ये वाढ होत आहे. सायंकाळी चार वाजता पुढील तीन तास अतिवृष्टी होण्याचा इशारा प्रशासनाने दिला होता.

# मुसळधार पावसामुळे रत्नागिरी जिल्ह्यात पुन्हा पूरस्थिती

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यात सलग दोन दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. शनिवार मध्यरात्रीपासून पावसाचा आणखी जोर वाढल्याने लांजा तालुक्यातील मुचकुंदी, राजापूरमधील काजळी नदी, चिपळूणमधील वाशिष्टी नदी, खेडमधील जगबुडी नदी आणि संगमेश्वरमधील शास्त्री या नद्यांच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ झाल्याने खेड, चिपळूण, संगमेश्वर, राजापूर शहर आणि रत्नागिरीतील चांदेराई बाजार पेठेत पाणी भरल्याने सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली आहे.



जिल्ह्याला सलग दोन दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे खेड, संगमेश्वर, चिपळूण, राजापुर, चांदेराई बाजार पेठेत पाणी भरल्याने व्यापाऱ्यांची चांगलीच धावपळ झाली. राजापुरमधील जवाहर चौकात पुन्हा पाणी भरले आहे. शहरातील जवाहर चौकासह वरचीपेठ मछिमार्केट कोंड्येतळ आधी भागांना पुराच्या पाण्याचा विळखा पडल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर एसटी प्रशासनाने जवाहर चौकातली वाहतूक बंद केल्याने ग्रामीण जनतेला आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला. शीळ गोठणे रस्त्यावर पाणी आल्याने हा मार्ग बंद करण्यात आला. तर रत्नागिरीतील चांदेराई बाजार पेठेत पाणी शिरण्याल्याने दुकानदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

राजापुर बाजार परिसरात चारवेळा पाणी भरल्याने येथील आर्थिक व्यवहार ठप्प झाले आहेत. तर लांजा येथे कोसळणाऱ्या पावसामुळे मुचकुंदी नदीला पूर आल्याने या पुराचे पाणी चांदेराईच्या बाजारपेठेत शिरले. यामुळे जवळपासच्या गावांचा संपर्क तुटला आहे. चांदेराई गावाजवळील चिंद्रवली नीरखुणे गावातील रस्ता खचला आहे. काजळी नदीला आलेल्या पुरामुळे मुंबई गोवा महामार्गावरील अंजणारी पूल वहातुकीसाठी बंद करण्यात आल्याने वाहनाच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. लांजा तालुक्यातील नावेरी आणि बेनी या नद्याही ओसंडून वहात आहेत. संगमेश्वरमधील शास्त्री नदीच्याही पाणी पातळीत झपाट्याने वाढ झाल्याने येथील पुराचे पाणी बाजार पेठेत शिरण्यास सुरुवात झाली आहे.

संगमेश्वर परिसरातील भागात देखील पावसाने चांगलाच जोर धरला आहे. चिपळूण येथील वाशिष्टी नदीच्या पाणी पातळीत वाढ होवू लागल्याने येथेही पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. चिपळूण बाजार पेठेतील काही सखल भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. पावसाचा असाच राहिल्यास कोयना धरणातून सोडण्यात आल्यास लवकरच पूरस्थिती निर्माण होण्याची भीती आहे. खेड तालुक्यातील जगबुडी नदीने धोका पातळी ओलांडली असून या नदीचे पाणी खेड बाजारात शिरले आहे. जिल्ह्यातील जगबुडी नदी धोका पातळीवर वहात आहे. तर काजळी नदी, शास्त्री नदी, कोंदवली नदी आणि मुचकुंदी या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे.

संततधार पावसामुळे रविवारी सकाळी मंडणगड शहरातील गांधी चौकातील पुलाजवळील भराव खचल्याने पुलावरून जाणारी वाहतूक तत्काळ बंद करण्यात आली आहे. दरम्यान तालुक्यात दोन दिवस संततधार बरसत असलेल्या पावसामुळे भारजा नदीला पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली. भोळवली धरण पूर्ण क्षमतेने भरले असून सांडव्यावरुन व विमोचकातून विसर्ग सुरू आहे. दोन दिवसाच्या संततधार अतिवृष्टीने एकंदरीत तालुक्यातील जनजीवन विस्कळीत करुन टाकले आहे. दापोली तालुक्यातील बामणघर गावातील हसमुख चाकले यांच्या घराचे अंशतः नुकसान झाले. या घराचे एकोणीस हजार रुपयांचे नुकसान झाल्याची पंचनाम्यात नोंद करण्यात आली आहे. तालुक्यातील सावित्री भारजा, निवळी या मुख्य नद्यांसह लहान मोठे ओढे दुथडी भरुन वहात आहेत. याचबरोबर चिंचाळी व भोळवली ही दोन धरणे पूर्णपणे भरली असून अन्य धरणे पंच्यानव टक्क्याहून अधिक भरली आहेत. मांदिवली व चिंचघरला जोडणाऱ्या पुलासह तालुक्यातील अनेक ठिकाणांच्या मोरी व कॉजवेवरुन पाणी जाऊन अनेक गावांचा संपर्क तुटला.

जिल्ह्यात एक जुनपासून आतापर्यंत सरासरी दोन हजार आठपेक्षा जास्त मिलीमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यात रविवारी दिवसभरात मंडणगड तालुक्यात १३९.८० मिमी सरासरी जास्त तर चिपळूण तालुक्यात ७६.७० मिमी सरासरी एवढ्या कमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. गतवर्षी २१ जुलैपर्यंत १४५३.७४ मिली एवढ्या सरासरी पावसाची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यात पावसाचा जोर बघता रत्नागिरी जिल्हा प्रशासनाने सर्वत्र सतर्कतेचे आदेश दिले आहेत. सर्व आपत्कालीन व्यवस्थांना पूरस्थितीचा सामना करण्यास तयार राहण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

## शरद इंजिनिअरिंग मेकॅट्रॉनिक्सच्या ४५ विद्यार्थ्यांची विविध कंपनीत निवड

**शिरोळ :** २० यड्राव येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील मेकॅट्रॉनिक्स विभागातील ४५ विद्यार्थ्यांची विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय नामांकित कंपनीत निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांची विप्रो पारी-पुणे, 'टीटाघर रेल सिस्टिम लि.-कोलकत्ता, आबेनस्टॉक पॉझिट्रॉन इलेक्ट्रोवर्क, सायंट इंजिनिअरिंग-पुणे, बेंचमार्कस इंजिनिअर्स-पुणे, एफोर्टेबल रोबोटीक्स अॅण्ड प्रिसिजन लि., आदित्य अॅटो प्रोडक्स अॅण्ड इंजिनिअरिंग लि.-बेंगलोर, डि.एस. अॅटोमेशन, इनयंत्रा टेक्नॉलॉजीस, पुणे, जॉन डिअर-पुणे, लिन अॅटोमेशन इक्विपमेंटस लि.-पुणे, मॅगना इंटरनॅशनल लि.-पुणे, टॅको-टाटा मोटर्स- पिंपरी पुणे, एक्केस बेळगांव, केसॉफ्ट इंजिनिअरिंग कन्सल्टंसी सर्व्हिस, स्टार इंजिनिअरिंग-पुणे, सुप्रिम इंजिनिअरिंग, टेकनोविंग्स अॅटोमेशन इंडिया-पुणे, टेक्सपिक आयटी सोल्यशन, द वल्ड ऑफ अॅटोमेशन-पुणे, वेदांत इडस्ट्रीज अशा विविध कंपनी निवड झाली आहे.

महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांसाठी स्पेशल अॅप्टीट्युड ट्रेनिंग, टेक्निकल स्कीलचे वेगळे प्रशिक्षण तसेच मॉक इंटरव्ह्यु यासह टेक्निकल सेशन, व्हॅल्यू अॅडेड प्रोग्रॅम, कंपनी स्पेसीपीक

# महाराष्ट्रीयन बेंदूर सण उत्साहात

**कुरूंदवाड :** येथे महाराष्ट्रीयन बेंदूर सण उत्साही वातावरणात झाला. यानिमित्त आयोजित केलेला खिलार बैलांचा कर तोडण्याचा कार्यक्रम प्रेक्षणीय झाला. यावेळी कर पाहण्यासाठी अबालवृद्धांनी मोठी गर्दी केली होती. कुरूंदवाड येथील भास्कर पाटील यांच्या मालकीच्या बिंनदाती खोंडाने प्रथम क्रमांक पटकावला, अन् ११००१ रुपये रोख व चांदीची गदा बक्षीसादाखल मिळवली.

महाराष्ट्र कला सांस्कृतिक संघ व महाशिवरात्री कृष्णावेणी माता महाप्रसाद ग्रुप यांच्यावतीने येथील शहर व परिसरातील बिनदाती खोडांच्या कर तोडीच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आयोजित करण्यात आल्या होत्यायामध्ये कुरूंदवाड व परिसरातील २६ बिंनदाती खोंडानी सहभाग घेतला होता.

या कर तोडण्याच्या स्पर्धेत पाच भाग करण्यात आले होते. पहिल्या फेरीत विनायक माळी, दुसऱ्या फेरीत अक्षय जुगळे, तिसऱ्या फेरीत भास्कर पाटील, चौथ्या फेरीत अथर्व मगदूम व पाचव्या फेरीत वीरेंद्र कडाळे यांची खोंडे प्रथम आली होती. या पाच खोंडातून अंतिम फेरी काढण्यात आली.

द्वितीय क्रमांक वीरेंद्र कडाळे यांच्या खोंडाने मिळवला. अन् ७००१ रुपये जिंकले. तृतीय क्रमांक विनायक माळी यांच्या खोंडाने मिळवून ५००१ रुपये तर चौथा क्रमांक अक्षय जुगळे यांच्या खोंडाने मिळवला, २००१ रुपये बक्षीस मिळवले. प्रत्येक विजेत्यास शील्ड देण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे औचित्य साधून कुरूंदवाड भूषण पुरस्कार देण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक राजू आवळे यांनी केले. पाहुण्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार रणजीत आवळे यांनी मानले.

यावेळी माजी नगराध्यक्ष दादासो पाटील बापू आसंगे, दयानंद मालवेकर, बाबासाहेब सावगावे, वैभव उगळे, रमेश भुजुगडे,रोपण जोंग, सुरेश बिंदगे, प्रा. सुनिल चव्हाण, तातोबा पाटील, विजय पाटील, रामभाऊ माळी, मोनाप्पा चौगुले, सतीश मलमे, तानाजी आलासे, साताप्पा बागडी, बंडू उमडाळे, उमेश कर्नाळे, अक्षय आलासे, रावसाहेब आवळे, विजय माने, राजू बेले, हर्षद बागवान, अमित आवळे, विशाल गायकवाड, अजित देसाई, संदेश तेवरट्टी आदीसह नागरिक उपस्थित होते.

# गजानन महाराजांची पालखी पंढरपुरातून शेगावकडे मार्गस्थ

**बुलढाणा :** विदर्भपंढरी शेगावमध्ये आज गुरुपौर्णिमा सोहळा रंगला असताना दूरवरच्या श्री क्षेत्र पंढरपूर येथून आज गजानन महाराज संस्थानच्या पालखीने स्वगृही म्हणजे शेगावनगरीकडे प्रस्थान केले. तब्बल साडेपाचशे किलोमीटरचा परतीचा खडतर प्रवास करून तीन ऑगस्टला ही वारी बुलढाणा जिल्ह्याच्या सीमेत प्रवेश करणार आहे. अकरा ऑगस्टला पालखी स्वगृही शेगावात डेरेदाखल होणार आहे. आज रविवारी, २१ जुलैला पहाटे तीन वाजता गजानन महाराज संस्थान शाखा पंढरपूर येथून श्रींची पालखी पहाटे ३ वाजता काल्याच्या कीर्तनाकरीता गोपाळ पुरी येथे रवाना झाली.



श्री गजानन महाराज संस्थानची पालखी पंढरपूरला आषाढ एकादशीसाठी सातशेच्यावर वारकऱ्यांसह १५ जुलै रोजी पंढरपूर येथे पोहोचली. १५ ते २० जुलै श्री क्षेत्र पंढरपूर येथे मुक्काम होती. आज पालखीचा परतीचा प्रवास सुरु झाला. आज सकाळी श्रींची काकडा आरती झाली. नंतर श्रींचा अभिषेक सोहळा पार पडला. सकाळी तिर्थक्षेत्र पंढरपूर येथे विठ्ठल रखुमाई दर्शन परिक्रमा करून गोपाळपुरा येथे श्रीहरीचे काल्याचे किर्तन पार पडले. यानंतर गजानन महाराज संस्थान शाखा पंढरपूर येथून सकाळी श्रींची पालखी परतीच्या पायदळ वारीस आरंभ झाला.

पंढरीच्या राया प्रभू दिनानाथा, आज्ञा द्यावी आता येतो आम्ही, असे मनोमन म्हणत शेगावीचा राणा आणि वारकरी शेगावकडे निघाले. श्रींच्या पालखीचा शेगावसाठी परतीचा प्रवास २१ जुलै रोजी पंढरपूर येथून सुरू झाला. परतीच्या प्रवासादरम्यान २१ जुलै रोजी पहिला मुक्काम करकंब, २२ जुलै कुईवाडी मुक्काम, २३ ला उपळाई स्टेशन मुक्काम, २४ ला भगवान बार्शी येथे मुक्काम, २५ ला भुम मुक्काम, २६ ला. चौसाळा मुक्काम, २७ ला. पाली मुक्काम, २८ ला बीड मुक्काम, २९, ला. गेवराई मुक्काम, ३० ला.शहापूर मुक्काम, ३१,ला लालवाडी येथे गजानन महाराजांची पालखी मुक्कामी राहणार आहे. १ व २ ऑगस्टला, जालना मुक्काम राहणार आहे.

**जिल्ह्यात प्रवेश कधी?**

३ ऑगस्टला शेगावची पालखी बुलढाणा जिल्ह्याच्या सीमेत प्रवेश करणार आहे. राजमाता जिजाऊंचे माहेर असलेल्या सिंदखेडराजा या ऐतिहासिक नगरीत पालखीचा जिल्ह्यातील पहिला मुक्काम राहणार आहे. यानंतर ४ ऑगस्टला बिबी (तालुका लोणार) मुक्काम, तर ५ तारखेला सरोवर नगरी लोणार येथे पालखी मुक्कामी राहील. ६ ऑगस्टला सारंगधर नगरी मेहकरमध्ये मुक्काम तर ७ तारखेला जानेफळ मुक्काम राहील, ८ ऑगस्टला खामगाव तालुक्यातील शिर्ला नेमाने मुक्काम, ९ ला आवार मुक्कामी राहील. १० ला खामगाव मुक्काम राहणार आहे. अंतिम टप्प्यातील ११ ऑगस्ट रोजीच्या खामगाव ते शेगाव वारीत बुलढाण्यासह इतर जिल्ह्यांतील हजारो भाविक, वारकरी सहभागी होतात. ११ ऑगस्टला सकाळी ११ वाजेपर्यंत पालखी शेगाव येथे दाखल होणार आहे.

दरम्यान शेगाव संस्थानाच्या पंढरपूर आषाढी एकादशी पायदळ वारीचे यंदा ५५ वे वर्ष आहे. शेगाव ते पंढरपूर आणि पंढरपूर ते शेगाव असा तेराशे किलोमीटरचा हा खडतर प्रवास आहे. जाण्यायेण्याचे मार्ग वेगवेगळे आहेत.

## राज्यात पावसाचं थैमान!

मागील २४ तासांपासून पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पनवेलमध्ये पालिका हद्दीतील खांदा वसाहतीमध्ये वृक्ष कोसळून अनेक वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचबरोबर मुंबईमध्ये देखील मागील दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे.

मागील २४ तासांपासून पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पनवेलमध्ये पालिका हद्दीतील खांदा वसाहतीमध्ये वृक्ष कोसळून अनेक वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचबरोबर मुंबईमध्ये देखील मागील दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. अनेक डॅमने त्यांची धोक्याची पातळी ओलांडली आहे आणि त्यामुळे शेजारील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईमध्ये मुसळधार पावसाचा परिणाम लोकल ट्रेनवर झाला आहे त्यामुळे लोकल ट्रेन १०-१५ मिनिटे उशिराने धावत आहेत.

# राज्यकर्ते आरक्षणाच्या प्रश्नांवर गंभीर नाहीत : खासदार सुप्रिया सुळे

**कराड :** राज्यकर्ते आरक्षणाच्या प्रश्नांवर गंभीर नसून, दोनशे आमदार असतानाही ते याबाबतचे बिल पास करू शकत नाहीत. त्यामुळे हे सरकार केवळ चालढकल करत असल्याचा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राला देशात पहिल्या नंबरवर नेण्याची क्षमता असणाऱ्यालाच संधी मिळावी. मी केवळ महिला खासदार नाही, तर खासदार असल्याची टिप्पणी सुळे यांनी केली.



कराडमध्ये माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीला गुरुपौर्णिमेनिमित्त अभिवादन केल्यानंतर त्या बोलत होत्या. आमदार बाळासाहेब पाटील, आमदार शशिकांत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रसचे जिल्हाध्यक्ष सुनील माने व कार्यकर्ते उपस्थित होते.

खासदार सुळे म्हणाल्या, राज्यात महागाई, बेरोजगारीमुळे जनता अडचणीत आहे. दूध, कापूस, सोयाबीन, कांदा आदी शेतमालाला दर नसल्याने शेतकऱ्याचे कंबरडे मोडायचे सरकारने ठरवले आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात पाठवण्याचे ११८ कोटी रुपये सरकारने निकृष्ट बियाणे खरेदी करण्यासाठी वापरल्याचा आरोप 'आरएसएस'ने त्यांच्या वृत्तवाहिनीवर केला आहे. यावर देवेंद्र फडणवीस यांनी चौकशी करण्याची गरज होती, ती त्यांनी केले नाही. प्रशासन व्यवस्थित काम करीत नसून, शेतकरी, महिलांचे प्रश्न, वाढती गुन्हेगारी भयंकर बनली आहे. राज्यातील सर्वाधिक गुन्हेगारी आज पुण्यात दिसत आहे. ज्या-ज्यावेळी भाजप सरकार आले, त्या-त्यावेळी गुन्हेगारी वाढल्याची केंद्राची आकडेवारी सांगते, असे खासदार सुळे यांनी सांगितले.

**यशवंतरावांची देशात ओळख**

गुरुपौर्णिमेनिमित्त चव्हाणसाहेबांच्या समाधीस्थळी अभिवादन करून त्यांचे आशीर्वाद घेतलेत. एक आदर्श गुरू, सुपुत्र, पती, सहकारी, कवी, लेखक व द्रष्टा नेता म्हणून त्यांची देशात ओळख आहे. त्यांनी शुन्यातून विश्व निर्मिले. त्यांच्या विचारांवरच आम्ही मार्गक्रमण करत असल्याचा विश्वास सुळे यांनी दिला.

लोकसभेच्या सातारा मतदारसंघातून शशिकांत शिंदेंच्या पराभवाबाबत विचारले असता त्या म्हणाल्या, राज्यकर्त्यांनी आमचा पक्ष, चिन्ह, आमदार अन् खासदारही नेल्यामुळे आमची ताकद अपुरी पडली. माझ्या बारामती मतदारसंघात तर सोसायटी, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद सदस्य, कारखाने, दूधसंघही नेले. त्यामुळे आम्ही ईस्ट इंडिया कंपनीशी लढत होतो. सत्ता, यंत्रणा त्यांची. कुठून कुठून मिळालेला निधीही त्यांचा. आमच्याकडे फक्त कष्टकरी नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, जनताही पाठीशी होती.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार; अजित पवार यांची मोठी घोषणा

**पुणे :** पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मेळावा उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज कसबा विधानसभा मतदारसंघात पार पडला. या मेळाव्यात अजित पवार यांनी स्थानिक स्वाराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढायच्या की महायुतीबरोबर, यावर स्पष्टीकरण दिले आहे.

मागील दोन वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नाहीत. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याला या निवडणुका केव्हा होणार, असा प्रश्न पडला आहे. लोकसभा निवडणूक भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षांनी एकत्र येऊन लढवली. या निवडणुकीत महायुतीला अपेक्षित जागा जिंकता आल्या नाहीत. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूक महायुतीमधील तीनही पक्ष स्वतंत्र लढतील अशी शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात असताना. अजित पवार यांनी विधानसभा आणि स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत आपली भूमिका मांडली आहे.

पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मेळावा पार पडला. त्यात अजित पवार यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन आपण



आगामी विधानसभा निवडणूक महायुती म्हणून लढणार आहोत, पण त्यानंतर होणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# कास तलावाच्या पाणीसाठ्यात झाली वाढ

## सातारा शहरातील पाणी कपातीबाबत मोठा निर्णय



**सातारा :** सातारा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या कास आणि उरमोडी येथील पाणीसाठा तीव्र उन्हामुळे खालावल्याने पालिकेने या दोन्ही योजनांवरील पाणीपुरवठ्यात कपात केली होती. सुमारे दोन महिन्यांहून अधिक काळ ही कपात साताऱ्यात सुरू होती. गेल्या काही दिवसांपासून शहरासह परिसरात आणि कास तलाव तसेच उरमोडी धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पावसामुळे येथील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. पावसामुळे वाढलेल्या पाणीसाठ्याचा अंदाज घेत पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने शहरातील पाणी कपात मागे घेण्याचा निर्णय घेतला.

गेल्या दोन दिवसांपासून अनौपचारिकपणे शहरातील सर्व साठवण टाक्यांमधून पूर्वीसारखाच सर्व प्रभागांना नेहमी इतका पाणीपुरवठा सुरू झाला आहे. कासमधील पाणीसाठ्याने ६१ फुटांची पातळी ओलांडली आहे. यामुळे त्याठिकाणच्या सांडव्यावरून पाणी ओसंडून वाहत आहे. ओसांडणाऱ्या पाण्यामुळे उरमोडीतील पाणीसाठ्यात वाढ होण्यास मदत झाली आहे.

कास परिसरात पावसाचा जोर कायम असल्याने आगामी काळात उरमोडीतील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होण्याची शक्यता आहे. काससह परळी खोऱ्यातही मुसळधार पाऊस सुरू असल्याने उरमोडीतील पाणीसाठ्यात वाढ होत आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत सद्य:स्थितीत उरमोडीतील पाणीसाठा कमी असला तरी तो समाधानकारक आहे.

### दारणा, भाम निम्मे भरले !

**राहाता :** सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर अधुन मधून येणार्या सरींनी दारणात कमी अधिक प्रमाणात पाण्याची आवक सुरु असल्याने काल सकाळी दारणा धरण निम्मे भरले! भाम धरणही निम्मे भरले. भावली ६२.०६ टक्क्यांवर तर गंगापूरचा साठा ३३.६६ टक्क्यांवर स्थिर आहे. काल पावसाने उघडीप दिली होती. मात्र काल सकाळी संपलेल्या मागील २४ तासात दारणाच्या पाणलोटातील घोटी येथे ३० मिमी, इगतपुरी येथे ४७ मिमी, दारणाच्या भिंतीजवळ १० मिमी पावसाची नोंद झाली. मागल २४ तासात दारणात ३४ दलघफू नविन पाणी दाखल झाले.

काल दारणा ४९.९५ टक्के झाले होते. ७१४९ दलघफू क्षमतेच्या या धरणात ३५७१ दलघफू पाणीसाठा झाला आहे. दारणाच्या वरील भावली काल सकाळी ६२.०६ टक्क्यांवर पोहचले. भावलीला काल सकाळी संपलेल्या मागील २४ तासात ६६ मिमी पावसाची नोंद झाली. भावलीत २४ दलघफू नविन पाणी दाखल झाले.१४३४ क्षमतेच्या या धरणात ८९० दलघफू पाणी साठा आहे. मुकणे धरण १६.०४ टक्के, वाकी ११.१२ टक्के, भाम ५०.७७ टक्के, वालदेवी २४.३६ टक्के असे साठे आहेत. काल सकाळी मागील २४ तासात मुकणे येथे ६ मिमी, वाकीला २१ मिमी, भामला ४२ मिमी असा पाउस नोंदला गेला. गंगापूर धरणाचा साठा मागील काही दिवसांपासुन स्थिर आहे. काल सकाळी मागील २४ तासात या धरणात पाणी आलेच नाही. हे धरण ३३.६६ टक्के इतके भरलेले आहे.

# ऐतिहासिक वाघनखे पाहण्यासाठी पावसातही सातारकरांची गर्दी



**सातारा :** सातारा शहरात मोठ्या थाटामाटात मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात लंडनच्या म्युझियममध्ये ठेवण्यात आलेल्या वाघ नखांच्या प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले. उदघाटनानंतर प्रदर्शन कालपासून खुले करण्यात आले असून काळ शनिवार आणि आज रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने सातारकरांनी मोठ्या संख्येने प्रदर्शन पाहण्यासाठी भेट दिली. इतर शिवकालीन वस्तू पाहण्यासाठी विद्यार्थी व नागरिक स्त्री-पुरुषांकडून मोठया संख्येने गर्दी केली जात आहे.

छत्रपती शिवाजी म्युझियमचे वाघनखे व प्रदर्शन पाहण्यासाठी शनिवारी दोन शाळांचे विद्यार्थी समूहाने आले होते. त्याचबरोबर स्त्री-पुरुष साधारणपणे पंधराशेच्या संख्येने आले होते. साधारणपणे तीन ते चार हजार जणांनी प्रदर्शन पाहिले.

शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफतच प्रदर्शन ठेवण्यात आले असून १६ ते १७ हजार रुपये प्रदर्शन बघणारांकडून वस्तू संग्रहालयाला मिळाले अशी माहिती सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे सहाय्यक अभिरक्षक (क्युरेटर) प्रवीण शिंदे यांनी दिली. ऐतिहासिक शाहूनगरीत पावसाचे प्रमाण जास्त असले तरी स्त्री पुरुष पावसापासून संरक्षण म्हणून छत्र्या घेऊनही प्रदर्शन व वाघनखे पाहण्यासाठी आले होते. जुन्या जागेतून श्री छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय हे नवीन जागेत आल्याने व त्याचे उद्घाटन झाल्याने अनेकांनी वस्तुसंग्रहालयाची नवीन इमारत व प्रदर्शन पाहणे साठी गर्दी केली होती.

# उद्धव ठाकरे हे औरंगजेब फॅन क्लबचे नेते अमित शाहांची टीका



**मुंबई :** अमित शाह यांनी आज पुण्यातील भाजपाच्या कार्यक्रमात शरद पवार यांच्या पाठोपाठ उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले, त्यांच्यावर सडकून टीका केली. कसाबला बिर्याणी खायला देणाऱ्या काँग्रेससोबत उद्धव ठाकरे गेले आहेत, याकुब मेननला सोडण्याची मागणी करणाऱ्यांबरोबर ठाकरे बसले आहेत, झाकिर नाईक यांना शांततादूत बवनण्यांच्या मांडीवर उद्धव ठाकरे बसले आहेत, झत्रख या संघटनेला पाठिंबा देणाऱ्यांचा मांडीला मांडी लावून उद्धव ठाकरे बसले आहेत, संभाजीनगरला विरोध करणाऱ्यांना पण हे साथ देत आहेत, यांना लाज वाटली पाहिजे अशी टीका अमित शाह यांनी यावेळी केली. राज्यात ' औरंगजेब फॅन क्लब ' म्हणजे कोण तर ते म्हणजे महाविकास आघाडी. आणि या औरंगजेब फॅन क्लबचे नेते आहेत उद्धव ठाकरे अशी बोचरी टीका अमित शाह यांनी केली.

पुण्यात गेले दोन दिवस भाजपाच्या राज्य कार्यकारिणीचे आयोजन केले होते. याचा समारोप केंद्रीय गृहमंत्री, भाजपाचे नेते अमित शाह यांच्या भाषणाने झाला. त्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना निवडणुकीसाठी तयारीला लागण्याच्या सूचना केल्या. यावेळी पण भाजपाच्या नेत्वृत्वाखाली महायुती पुन्हा सत्तेत येईल असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या नव्या महाप्रसादगृहाचे भूमिपूजन

## एक लाख भाविकांना महाप्रसादाचा लाभ



**सोलापूर :** श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी अक्कलकोटमध्ये येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी अखंडपणे कार्यरत असलेल्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापनदिन आणि गुरूपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. दिवसभर लाखापेक्षा जास्त भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. याचवेळी सुमारे ६५ कोटी रुपये खर्च उभारण्यात येणाऱ्या पाच मजली वातानुकूलित महाप्रसादगृहाचे भूमिपूजनही करण्यात आले. सायंकाळी नगर प्रदक्षिणेसह भव्य कार्यक्रम पार पडले.

सकाळी श्री स्वामी समर्थ सारामृत ग्रंथाचे पारायण, नामस्मरण, जप, श्री गुरूपूजन आदी धार्मिक कार्यक्रम पार पडल्यानंतर श्रींना महानैवेद्य अर्पण करण्यात आले. त्यानंतर संपूर्ण वातानुकूलित पाच मजली महाप्रसादगृहाचे भूमिपूजन करण्यात आले. श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिराचे मुख्य पुरोहित मंदार पुजारी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी मंत्री सिद्धाराम राम म्हेत्रे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष जन्मेंजयराजे भोसले, प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, महाराष्ट्र राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदू जोशी, ज्येष्ठ वकील नितीन हबीब, पुण्याच्या अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष जनार्दन थोरात, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, अनिल पाटील (ठाणे) कैलास वाडकर (शिरवळ, पुणे) आदींच्या उपस्थितीत भूमिपूजन झाले. नव्या महाप्रसादगृहाचे बांधकाम एक लाख १९ हजार २९८ चौरस फूट क्षेत्रात होणार आहे. येत्या दोन वर्षांत बांधकाम पूर्ण होणार आहे.

मंडळाचे सचिव शाम मोरे यांनी आभार मानले. अन्नछत्र मंडळात गेले दहा दिवस धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक सोहळ्यासह रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शेकडो भाविकांनी रक्तदान केले. गुरूपौर्णिमेनिमित्त परगावाहून आलेल्या हजारो वाहनांना थांबण्याची सोय करण्यात आली होती. महाराष्ट्र, कर्नाटकासह तेलंगणा, गुजरात, गोवा आदी प्रांतांतून भाविक आले होते.

### सफाई कामगारांसाठी केंद्रीय आयोग २२ ते २८ जुलै महाराष्ट्रात

**सातारा :** केंद्रीय सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष श्री एम वेंकटेशन हे २२ ते २८ जुलै या कालावधीमध्ये महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याची जय्यत तयारी झालेली आहे.

पुनर्वसन कायदा,२०१३ म्हणून रोजगारावर बंदी अंतर्गत महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. सातारा जिल्ह्यात शनिवार दिनांक २७ जुलै रोजी आढावा घेण्यात येणार आहे.

सफाई कर्मचाऱ्यांच्या विमा व भविष्य निर्वाह निधी याचा तपशील व बैठकीला सर्व वैयक्तिक सफाई कर्मचाऱ्यांनी अनिवार्यपणे उपस्थित राहतील असे निदर्शनास आणलेले आहे.

# गांधीतीर्थ स्वच्छ शाळा स्पर्धेमध्ये नरके पन्हाळा पब्लिकचा सन्मान




पुरस्कार स्वीकारताना प्राचार्या माहेश्वरी चौगुले, समन्वयक प्रेमा स्वामी व मान्यवर

**पन्हाळा :** गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव आयोजित गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय स्पर्धा २०२४ मध्ये नरकेज् पन्हाळा पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज पन्हाळा या शाळेस राज्यात ग्रामीण विभागात विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गांधी तीर्थ स्वच्छ शाळा या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये शहरी, ग्रामीण व महानगर असे तीन गट होते.सदर स्पर्धेमध्ये राज्यभरातून १६१ शाळा सहभागी झाल्या होत्या. यापैकी ४१ शाळांना जैन इरिगेशन कंपनीच्या वतीने विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आले.या स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ शनिवार ,दि.२० जुलै रोजी पारपडला. त्यावेळी ज्येष्ठ अणुवैज्ञानिक डॉ. अनिल काकोडकर , डॉ. सुदर्शन अय्यंगार , माजी कुलगुरू गुजरात विद्यापीठ,अशोक भाऊ जैन, चेअरमन,जैन इरिगेशन लिमिटेड व गिरीश कुलकर्णी,परीक्षा विभाग प्रमुख यांच्या हस्ते नरकेज् पन्हाळा पब्लिक स्कूलच्या प्राचार्या माहेश्वरी चौगुले व शाळेच्या मराठी विषय शिक्षिका गांधी स्वच्छता कार्यक्रमाच्या समन्वयक प्रेमा स्वामी यांनी स्वीकारला.शाळेच्या या उत्तुंग यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.तर या यशामध्ये शाळेचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्य मिळालेने हे यश संपादन केलेले आहे असे बोलत चेअरमन संदीप नरके यांनी सर्वांचे आभार मानले.

# विधानसभा निवडणुकीसाठी अहमदनगर जिल्ह्यातील सात जागांवर काँग्रेसने ठोकला दावा

**अहमदनगर :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबई येथे शुक्रवारी झालेल्या प्रदेश काँग्रेसच्या बैठकीत नगर जिल्ह्यातील संगमनेर, राहता, श्रीरामपूर यासह नगर शहर, श्रीगोंदा, कोपरगाव व अकोले हे मतदारसंघ पक्षाकडेच घेण्याची आग्रही मागणी जिल्हाध्यक्ष जयंत वाघ व शहराअध्यक्ष किरण काळे यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली.

यावेळी बैठकीस अखिल भारतीय काँग्रेस समितीचे महासचिव के.सी. वेणूगोपाल, राष्ट्रीय महासचिव मुकुल वासनिक, प्रदेश काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रांताध्यक्ष आमदार नाना पाटोले, काँग्रेस विधिमंडळ पक्ष नेते आमदार बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, मुंबई काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष आमदार वर्षा गायकवाड, प्रदेश सचिव सचिन गुंजाळ यांच्यासह काँग्रेसचे अनेक बडे नेते उपस्थित होते.

यावेळी बोलताना वाघ व काळे यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने नगर शहरासह जिल्ह्याच्या एकूण राजकीय परिस्थितीचा सविस्तर आढावा मांडला. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील एकूण सात जागांवर दावा केला. दक्षिणेत काँग्रेसने विधानसभेची मागील वेळी एकही जागा लढली नव्हती.

आता महाविकास आघाडी आहे. शिवसेनेने श्रीगोंद्यावर दावा केला आहे.

नगरमध्ये किरण काळेंच्या रूपाने काँग्रेसकडे उमेदवार आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीमध्ये नगर शहराची जागा ही काँग्रेसलाच मिळावी. राष्ट्रवादीने त्यासाठी लोकसभेला काँग्रेसने केलेल्या मदतीची परतफेड केली पाहिजे, असे यावेळी वाघ म्हणाले.

# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन, पोलिस, एसडीआरएफ, स्थानिक स्वराज्य संस्थांनी सतर्क रहावे

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचना

**मुंबई :** मुंबईसह कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्याचबरोबर इतरही काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यापार्श्वभूमीवर एसडीआरएफ, जिल्हा प्रशासन, पोलीस, महापालिका, नगरपालिका

आदी विविध स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सतर्क रहावे आणि नागरिकांना सर्वतोपरी मदत करावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.

सर्व प्रशासनाने अलर्ट राहावे, हवामान खात्याकडून तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून परिस्थितीची वेळोवेळी माहिती घेण्यात यावी आणि त्यानुसार नियोजन आणि व्यवस्थापन करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

दुर्घटनेच्या संभाव्य क्षेत्रांचे सर्वेक्षण करावे, नागरिकांना त्याबाबत सतर्क करावे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिक्रिया दल आणि राज्य आपत्ती प्रतिक्रिया दलाची तयारी उच्च पातळीवरची असावी. बंधारे, तलाव यांचे पाणीस्तर निर्धारित करावेत आणि पुराचा धोका निर्माण होऊ नये यासाठी नियंत्रित पाण्याचा विसर्ग करण्याची यंत्रणा उपलब्ध करून ठेवावी. पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास अशा क्षेत्रात वाहतूक बंद करावी आणि ती पर्यायी मार्गावर वळवावी. हवामान खात्याशी समन्वय साधावा, त्यांच्याकडून देण्यात येणारे विविध अलर्टस् (इशारे), माहिती यासंदर्भात नागरिकांना जलद गतीने अवगत करावे.

पूरग्रस्त क्षेत्रात अन्नधान्य, औषधे आणि साह्यकार्य साहित्य उपलब्ध करून ठेवावे. पर्यायी निवारास्थाने आणि राहण्यासाठी ठिकाणे उपलब्ध करून ठेवावीत, पूरस्थिती निर्माण झाल्यास जनावरांच्या स्थलांतराची व्यवस्था तयार ठेवावी, अशा विविध सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

सर्वांनी सतर्क राहून नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत याची दक्षता घ्यावी, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले आहे.

# मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सर्वतोपरी सहकार्य केलं जाईल ; आ. ऋतुराज पाटील



**कोल्हापूर :** साने गुरुजी वसाहत परिसरातील संतोष कॉलनी इथल्या श्री दत्त मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सर्वतोपरी सहकार्य केलं जाईल , अशी ग्वाही आमदार ऋतुराज पाटील यांनी दिली . ते आज या मंदिराच्या जीर्णोद्धार कामाच्या शुभारंभावेळी बोलत होते . या मंदिरासह परिसराच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला जाईल अस त्यांनी यावेळी सांगितलं .

साने गुरुजी वसाहत परिसरामध्ये संतोष कॉलनी आहे . या कॉलनीमध्ये सुमारे ४५ वर्षांपासूनचं श्री दत्त मंदिर आहे . या दत्त मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामाचा शुभारंभ आज गुरुपौर्णिमेनिमित्त आमदार ऋतुराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आला . सुरुवातीला या परिसरातील महिलांनी आमदार ऋतुराज पाटील यांच औक्षण करून त्यांच स्वागत केलं. त्यानंतर आमदार ऋतुराज पाटील यांच्यासह परिसरातील मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून , या मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचा शुभारंभ करण्यात आला . इथले अभियंता भूषण पाटील यांनी या मंदिराच्या बांधकामाविषयीची माहिती यावेळी आमदार ऋतुराज पाटील यांना सांगितली . या मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी सर्वतोपरी सहकार्य केल जाईल , अशी ग्वाही यावेळी आमदार ऋतुराज पाटील यांनी दिली . या मंदिरासह परिसरातील अन्य विकासकामांसाठीही भरीव निधी उपलब्ध करून दिला जाईल , असं त्यांनी नमूद केल .यावेळी उद्योगपती आणि दत्तभक्त मंडळाचे मोहनराव कोंडुसकर , दिनकर पाटील , के .आर .पाटील , नामदेव बरगे, नरहरी पंडितराव, विठ्ठल कुंभार , सुशीला पाटील , दिपांजली पाटील, कल्पना पाटील , सुधा पाटील यांच्यासह परिसरातील महिला आणि नागरिक मोठ्या संख्येन उपस्थित होते .

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू २८ जुलैला कोल्हापूर दौऱ्यावर



**कोल्हापूर :** राज्यामध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा नियोजित दौरा असणार आहे. येत्या रविवारी २८ जुलै रोजी द्रौपदी मुर्मू महाराष्ट्रामध्ये येणार आहेत. त्यांचा हा दौरा कौल्हापूरमध्ये असणार आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस कार्तिकेयन, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली, पोलीस अधीक्षक महेंद्र उपस्थित होते. राष्ट्रपतींचे आगमन, दौरा आणि सुरक्षा याबाबत काळजी घेतली जात आहे.

येत्या २८ जुलै रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या सकाळी कोल्हापूरमध्ये करवीर निवासनी अंबाबाईचे दर्शन घेणार आहेत. देवीचे दर्शन घेतल्यानंतर राष्ट्रपती पुढे वारणेला जाणार आहेत. या ठिकाणी विविध विकास कामांचे उद्घाटन आणि लोकार्पण करणार आहेत. वारणा येथे नव्याने मान्यता मिळालेल्या वारणा विद्यापीठाच्या उद्दघाटनाचा कार्यक्रम देखील होणार आहे. त्यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित राहणार आहेत.

सकाळी कोल्हापूर विमानतळावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू येणार आहेत. त्यानंतर देवीचे दर्शन घेणार आहेत. दुपारचे राष्ट्रपतींचे जेवण शासकीय निवासस्थानी होणार आहे. त्यानंतर दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास त्या लोकार्पण कार्यक्रमास हजेरी लावणार आहेत. त्यानंतर सायंकाळी पाच वाजता विमानाने त्या दिल्लीकडे रवाना होणार आहेत. असा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या कोल्हापूर दौऱ्याचा कार्यक्रम असणार आहे.

# साईनगरी भक्तांनी गजबजली

**शिर्डी :** शिर्डीमध्ये गुरूपौर्णिमा मोठ्या उत्सहात साजरी केली आहे. साईबाबांना गुरू स्वरूप मानत हजारो साईभक्त गुरूचरणी नतमस्तक होतात.

गुरूपौर्णिमा उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने साई समाधी मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्याचा निर्णय साईबाबा संस्थाने घेतला आहे. साई समाधी मंदिरासह भाविक गुरूस्थान मंदिरातही दर्शनासाठी गर्दी केल्याच पहायला मिळत आहे. देशभरातील आलेल्या साई भक्तांमुळे दर्शन रांगा फुलल्या असून भाविकांची मांदीयाळी दिसून येत आहे.

साईबाबांच्या मंदिरात काल सुरू झालेल्या साईसचरित्र ग्रंथाच्या अखंड पारायणाची समाप्ती आज करण्यात आली. अखंड पारायण समाप्ती मिरवणूकीत संस्थानचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांनी पोथी, मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी वीणा तर संरक्षण अधिकारी रोहिदास माळी आणि इंग्लिश मिडीअम स्कूलचे प्राचार्य आसीफ तांबोळी यांनी प्रतिमा घेवून सहभाग घेतला. यावेळी शिर्डी ग्रामस्थ आणि साईभक्त मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

यावर्षी उत्सवाच्या निमित्ताने दानशूर साईभक्त सुभा पै. अमेरीका यांच्या देणगीतून मंदिर व परिसरात केलेली फुलांची आकर्षक सजावट व साईराज डेकोरेटर्स, मुंबई यांनी मंदिर व परिसरात केलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने साईभक्तांचे लक्ष वेधुन घेत आहे.

# ‘ओला-सुका’ वर्गीकरणासाठी साताऱ्यात विशेष मोहिम



**सातारा :** सातारा जिल्ह्यातील प्रत्येक घरातील व परिसरातील ओल्या-सुक्या कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण करण्यासाठी पूर्ण सातारा जिल्ह्यात दि. ७ ऑगस्टपर्यंत मोहीम राबवण्यात येणार आहे.जिल्ह्यातील प्रत्येक गावात स्वच्छतेचे दोन रंग ओला (हिरवा), सुका (निळा) या नावाने अभियान राबवले जाणार आहे.

राज्यातील गावस्तरावर दि. ७ ऑगस्टपर्यंत विशेष मोहीम राबवण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. त्यानुसार जिह्यातील प्रत्येक गावात हे अभियान राबवले जाणार आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत महाराष्ट्र हगणदारीमुक्त अधिक मॉडेल करावयाचे आहे. मॉडेल झालेल्या गावात शाश्वत स्वच्छता ठेवणे आणि हगणदारीमुक्त अधिक झालेली गावे मॉडेल करण्यासाठी विविध विषयांच्या उपक्रमामार्फत गृहभेटीच्या माध्यमातून जनजागृतीसाठी विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. ओला कचरा हिरव्या रंगाच्या डब्यात व सुका कचरा निळ्या रंगाच्या डब्यात वर्गीकरण करून त्याचे योग्य व्यवस्थापन करावे.

प्रत्येकाने नियमित शौचालयाचा वापर करणे, शास्त्रयुक्त पद्धतीने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, प्लॅस्टिक व्यवस्थापन, सुयोग्य मैला गाळ व्यवस्थापन, गावात येणाऱ्या छोट्या व्यावसायिक व्यक्तींनी उपलब्ध सार्वजनिक शौचालयाचा वापर करावा. याबाबत गृहभेटीतून माहिती देण्यात येणार आहे. भेटीदरम्यान शासनाच्या गुगल लिंकद्वारे त्या कुटुंबाची फोटोसह माहिती राज्य शासनास सादर करण्यात येणार आहे.

मोहिमेच्या पार्श्वभूमीवर तालुकास्तरावरील सर्व अधिकारी, विस्तार अधिकाऱ्यांनी संनियंत्रण करून अंमलबजावणी करावी. दर आठवड्याला या अभियानाचा जिल्हास्तरावरून आढावा घेण्यात येणार आहे. दि. ७ ऑगस्टपर्यंत राबवण्यात येणाऱ्या ओला व सुका कचरा व्यवस्थापन मोहिमेत ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी केले आहे.

प्रत्येक गावात ५ संवादकांची निवड करण्यात येणार असून, हे संवादक प्रत्येकाच्या घरी जाऊन स्वच्छतेचे संदेश देणार आहेत. यात सरपंच, उपसरंपच, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामसेवक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, स्वच्छाग्रही व बचत गटातील महिलांचा समावेश आहे.

# पुराचा धोका वाढला ! पंचगंगेच्या पाणीपातळीत वाढ; कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक मार्ग बंद

कोल्हापूर : संपूर्ण कोल्हापूर जिल्हयाला मुसळधार पावसाने झोडपून काढल्याने अवघा जिल्हा पाणीमय झाला आहे. जिल्ह्याच्या सर्वच भागात मुसळधार पावसाची संततधार सुरू असून, काही भागात अतिवृष्टी झाली आहे. पंचगंगा नदी इशारा पातळीकडे गेली आहे. सततच्या पर्जन्यवृष्टीमध्ये पंचगंगा, कृष्णा, वारणा, दूधगंगा, वेदगंगा, ताम्रपर्णी अशा सर्व नद्यांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली आहे. त्यामुळे पंचगंगा नदीमुळे पुराचा धोका वाढला आहे.

शनिवारी दिवसभर पावसाच्या सरी कोसळत होत्या. रात्री १० नंतर पावसाने उघडीप दिली होती. रविवारी सकाळी सात वाजता पुन्हा पावसाने जोर धरला आणि दुपारी एक वाजेपर्यंत अतिमुसळधार पाऊस सर्व ठिकाणी कोसळला. त्यामुळे पंचगंगा नदीची पाणीपातळी सायंकाळी चार वाजता ३८ फूट २ इंचावर आली होती. तर ३९ फूट ही इशारा पातळी आहे. ७५ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. कोगे पुलावर पाणी आल्याने तो वाहतुकीसाठी बंद केला आहे. दूधगंगा नदीला पूर आल्याने कर्नाटककडे जाणाऱ्या राधानगरी - निपाणी राज्य मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. लोखंडी कठडे लावून रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला असला तरी पुराचे पाणी पाहण्यासाठी गर्दी होऊ लागल्याने चिंता व्यक्त होत आहे.

दरम्यान, संभाव्य पूरस्थितीचा विचार करून जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन प्रशासकीय यंत्रणेला सतर्क राहण्याच्या सूचना केल्या आहेत. स्वयंसेवक आणि एनडीआरएफची पथके सज्ज ठेवावीत, पूर निर्माण झाल्यास नागरिक आणि जनावरांचे स्थलांतर वेळेत करावे, पुराचे पाणी आलेले रस्ते बंद करावेत अशा सूचना त्यांनी केल्या आहेत. तर इचलकरंजी महापालिकेच्या आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी पंचगंगा नदीकाठी भेट देऊन पूरस्थितीची पाहणी केली आहे.





कृष्णा, कोयना, वारणा, तारळी, पंचगंगा या सर्व नद्या दुथडी भरून वाहत आहेत. नद्यांचे पाणीही वेगाने वाढते आहे. परिणामी कृष्णा,वारणा आणि पंचगंगा या नद्यांच्या काठावरील सांगली, कोल्हापूर, सातारा या सर्व जिल्ह्यातील शहरे आणि गावांना महापुराचा धोका निर्माण झाला आहे. परंतु सांगली कोल्हापूर जिल्ह्याचे स्थानिक प्रशासन तसेच जलसंपदा विभागातर्फे अलमट्टी धरणातील पाणीसाठा कमी करण्यासाठी कोणतीही हालचाल होताना दिसत नाही. अलमट्टी धरण आणि त्या शेजारच्या हिप्परगी बंधाऱ्यामध्ये नियमबाह्यरित्या पाणीसाठा केला जात आहे. वास्तविक अलमट्टी धरणातून आत्ताच तातडीने किमान दोन लाख क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग वाढवण्याची गरज आहे. तरच महापुरावर नियंत्रण करता येईल. परंतु सांगली व कोल्हापूर जिल्हा प्रशासन तसेच जलसंपदा विभागाचे अधिकारी त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करीत आहेत. जोरदार पाऊस सुरू असताना आणि धरणे भरण्याची वेळ आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील नद्यांच्या काठावरील शहरे आणि ग्रामीण भाग यांच्यासमोर महापुराचे भयंकर संकट उभे राहण्याची दाट शक्यता आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यांसमोर महापुराचे पुन्हा एकदा संकट उभे राहिले आहे. अलमट्टी धरणातून किमान दोन लाख क्यूसेक्स विसर्ग वाढवण्यासाठी कर्नाटक शासनावर दबाव आणावा, अशी मागणी कृष्णा नदी महापूर नियंत्रण कृती समिती आणि आंदोलन अंकुश यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. मात्र याकडे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अलमट्टी धरणातील पाणीसाठा जवळजवळ शंभर टीएमसी झाला आहे. तसेच त्या धरणाची पाणीपातळी आत्ताच ५१८ मीटर झाली आहे. वास्तविक ही पाणीपातळी पावसाळा संपायला हवी होती पण ती आत्ताच गाठली आहे. परंतु याकडे सांगली व कोल्हापूर जिल्ह्याचे प्रशासन आणि जलसंपदा विभाग लक्ष द्यायला तयार नाही. त्यांनी तातडीने कर्नाटक प्रशासन तसेच तेथील जलसंपदा विभागाच्या

# बेनकेंनंतर आणखी एक आमदार शरद पवार गटाच्या वाटेवर

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या आधी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार पुन्हा एकत्र येऊ शकतात, असे विधान जुन्नरचे अजित पवार यांच्या गटाचे आमदार अतूल बेनके यांनी केले होते. त्याआधी त्यांनी जुन्नरच्या दौऱ्यावर असलेल्या शरद पवार यांची भेटही घेतली होती. त्यामुळे अतूल बेनके शरद पवारांकडे जाणार असल्याच्या चर्चा जोर धरू लागल्या होत्या.

अतूल बेनके यांच्या या भूमिकेला २४ तास उलटत नाहीत तोच अजित पवारांच्या आणखी एका आमदाराने शरद पवार आणि अजित पवारांच्या एकत्र येण्याच्या चर्चांचा पुनरुच्चार केला आहे. पिंपरी चिंचवडचे अजित पवार यांच्या गटाचे आमदार अण्णा बनसोडे यांनी यावर भाष्य केलं आहे. त्यामुळे अजित पवार यांच्या गोटात पुन्हा बंडखोरीचे वादळ घोंगावत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

अण्णा बनसोडे यांनी अतूल बेनके यांच्या दाव्यावर भाष्य करत त्यांच्या दाव्याला दुजोरा दिला आहे. काल अतूल बेनके जे म्हणाले राजकारणाची शाश्वती नाही. राजकारणात कधीही काहीही होऊ शकते. ते सत्यच आहे. अजितदादा आणि शरद पवार साहेब आमच्यासाठी एकच आहेत. ते एकत्र आले तर आम्हाला आनंद आहे. असे बनसोडे यांनी म्हटले आहे. यासाठी काही हालचाली सुरू आहेत का, असा सवाल विचारला असता बनसोडे म्हणाले, ते दोघे मोठे नेते आहेत. चर्चा करणे हे त्यांच्यावर अवलंबून आहे. मी यासंदर्भात दादांशी बोलू शकतो. पण साहेबांशी दादाच बोलू शकतात. असेही बनसोडे यांनी म्हटले होते.

दरम्यान, काल अतूल बेनके यांनीदेखील अजित पवार आणि शरद पवार विधानसभा निवडणुकीआधी एकत्र येण्यावर भाष्य करत खळबळ उडवून दिली होती. विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना काहीही होऊ शकते. त्यावर आताच भाष्य करण्यत काहीही अर्थ नाही. आता आम्ही महायुती म्हणून पुढे जात आहोत, पण जागा वाटपावरून काही झालं तर आम्ही आम्ही, कदचित दादा आणि शरद पवार साहेब पुन्हा एकत्र येऊ शकतात. राज्यातील २८८ आमदारांपैकी जुन्नर तालुक्यातील मी एक छोटासा लोकप्रतिनिधी आहे. त्यामुळे राजकारणात पुढे काय घडेल, हे मी आताच सांगू शकत नाही. असेही त्यांनी म्हटले आहे.

# ‘भाजप सरकारने देशात सुरु केली दडपशाही’; खासदार सुप्रिया सुळेंची टीका

**संभाजीनगर :** देशात भाजप सरकार आल्यापासून सर्वसामान्य जनतेचे हाल केले आहे. सध्या देखील देशात दडपशाही सुरू आहे, दडपशाही चालू देणार नाही. ते संविधान बदण्यासाठी बसले आहेत. त्यांना संविधान बदलायचे आहे. संसदेत आम्ही संविधान वाचवण्याचे काम करणार आहोत. यासाठी आता हे भाजपचे भ्रष्टाचारी सरकार बदलून आपले महाविकास आघाडीचे सरकार आगामी विधानसभा निवडणुकीत आणायाचे असल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

पैठण येथे राष्ट्रवादीतर्फे आयोजित विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गाव जनसंवाद यात्रेप्रसंगी बोलत होत्या. यावेळी माजी आरोग्य मंत्री आमदार राजेश टोपे, राज्यसभा खासदार फौजिया खान यांच्यासह आबासाहेब भुमरे यांच्यासह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आम्ही लोकसभेच्या निकालानंतर तात्काळ विधानसभेची तयारी सुरू केली आहे. आमच्या पक्षाचे चिन्ह, नाव चोरून घेऊन गेले. मात्र, याच संघर्षातून नव्याने आम्ही उभे राहत आहोत.

लोकसभा निवडणूक जनतेने हाती घेतल्यामुळे विरोधकांना चांगली चपराक बसली आहे. यातून राष्ट्रवादीला मोठे यश मिळाले असले तरी ही हवा डोक्यात जाऊ न देता कार्यकर्त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीत विजयी होण्यासाठी जनतेच्या संपर्कावर भर द्यावा लागणार आहे, असे आवाहन त्यांनी केली. आगामी काळात सरकार आपलं असणार आहे. त्यानंतर सर्वात जास्त पर्यटक महाराष्ट्रातील अजिंठा, वेरुळला येतील, मी दुबईला कधीच जाणार नाही येथे काही नाही त्याच्यापेक्षा महाराष्ट्र अधिक बघण्यासारखे आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. सध्या केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची स्तुती करत ते चांगले काम करतात असे सांगितले. मात्र, मला व अमोल कोल्हे यांना निधी दिला जात नाही. सध्या सुडाचे राजकारण सुरू असल्याचे सुळे म्हणाल्या.

# ‘स्मार्ट सिटी’मार्फत गोदावरी सुशोभिकरणाची कामे

**नाशिक :** स्मार्ट सिटीमार्फतगोदावरी सुशोभिकरणाची कामे करण्यात येत आहेत. मात्र, या कामांदरम्यान गोदा घाटावरी पुरातन वास्तूंची तोडफोड करत हा ऐतिहासिक वारसा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. याविरोधात शहरातील विविध पक्ष - संघटनांच्यावतीने शनिवार (२० जुलै) रोजी सकाळी पंचवटीत रामकुंड, गोदा घाटावर जलाधिवास आंदोलन करण्यात आले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

गोदा घाटावरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी बांधलेला घाट व गांधी तलाव हे काळ्या पाषाणातील मजबूत घाट आहेत. सुशोभिकरणाच्या नावाखाली या घाटाची तोडफोड केली जात आहे. त्यामुळे नदीपात्र अधिकच अरूंद होण्याची शक्यता आहे. या आंदोलनात धनगर विकास परिषद, सकल हिंदू समाज, नाशिक बचाव समिती, पर्यावरणप्रेमी, पुरोहीत संघ, संतसेवा समितीच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक पक्ष व संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. यात प्रामुख्याने माजी आमदार वसंत गिते,



माजी महापौर विनायक पांडे, महापालिकेचे माजी सभागृह नेते राजेंद्र बागुल, पुरोहित संघाचे अध्यक्ष सतिश शुक्ल, पंचवटी फोरमच्या प्रमुख कल्पना पांडे, धनगर समाज विकास परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष सिध्देश्वर शिंदे तसेच उद्धवसेना, काँग्रेस, भाजपा, शिवसेना आदी पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी कार्यकर्ते हातात फलक घेऊन घोषणा देत होते. प्रदुषण मुक्त गोदावरी, मनपा प्रशासनाचा निषेध अशा अनेक घोषणांचे फलक लक्ष वेधून घेत होते.

# विधानसभा निवडणुकीसाठी अहमदनगर जिल्ह्यातील सात जागांवर काँग्रेसने ठोकला दावा

**अहमदनगर :** यावेळी बैठकीस अखिल भारतीय काँग्रेस समितीचे महासचिव के.सी. वेणूगोपाल, राष्ट्रीय महासचिव मुकुल वासनिक, प्रदेश काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रांताध्यक्ष आमदार नाना पाटोले, काँग्रेस विधिमंडळ पक्ष नेते आमदार बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, मुंबई काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष आमदार वर्षा गायकवाड, प्रदेश सचिव सचिन गुंजाळ यांच्यासह काँग्रेसचे अनेक बडे नेते उपस्थित होते.

यावेळी बोलताना वाघ व काळे यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने नगर शहरासह जिल्ह्याच्या एकूण राजकीय परिस्थितीचा सविस्तर आढावा मांडला. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील एकूण सात जागांवर दावा केला. दक्षिणेत काँग्रेसने विधानसभेची मागील वेळी एकही जागा लढली नव्हती. आता महाविकास आघाडी आहे. शिवसेनेने श्रीगोंद्यावर दावा केला आहे. नगरमध्ये किरण काळेंच्या रूपाने काँग्रेसकडे उमेदवार आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीमध्ये नगर शहराची जागा ही काँग्रेसलाच मिळावी. राष्ट्रवादीने त्यासाठी लोकसभेला काँग्रेसने केलेल्या मदतीची परतफेड केली पाहिजे, असे यावेळी वाघ म्हणाले.

# सातारा जिल्ह्यात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि धार्मिक कार्यक्रमांनी साजरी

**सातारा :** दरवर्षी आषाढ महिन्यातील व्यासपौर्णिमेला अर्थात गुरुपौर्णिमेला गुरूंच्या प्रती आदरभाव व्यक्त केली जाणारी पौर्णिमा म्हणून गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. यावर्षी रविवारी आलेल्या या गुरुपौर्णिमेनिमित्त जिल्ह्यातील विविध मंदिरांमध्ये तसेच गुरु गुरु विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते .सातारा जिल्ह्यातील रामनामाचा महिमा वर्णन करणाऱ्या माण तालुक्यातील श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांच्या श्रीक्षेत्र गोंदवले बुद्रुक येथे गुरुपौर्णिमेनिमित्त अनेक भक्तांनी दर्शनासाठी सकाळपासून रात्री उशिरापर्यंत गर्दी केली होती. यावेळी मंदिरामध्ये समाधीवर महाराजांना पवमान, पंचसूक्त अभिषेक करून महापूजा करण्यात आली .गोंदावले संस्थांनचे विश्वस्त यांनी ही पूजा केल्यानंतर दर्शनासाठी भाविकांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या.

सातारा जिल्ह्यातील श्री क्षेत्र सज्जनगड येथे गुरुपौर्णिमेनिमित्त विविध अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रामदास स्वामी संस्थान आणि समर्थ सेवा मंडळाच्या वतीने हे कार्यक्रम आयोजित केले होते. राज्यभरातून सज्जनगडावर समर्थ भक्तांनी समाधीचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती .रामदास स्वामी संस्थांच्या वतीने सकाळी सात वाजता समाधीवर महापूजा करण्यात आली .त्यानंतर दुपारी अडीच वाजता पंडित प्रमोद गायकवाड यांचे सनई वादन संपन्न झाले. दुपारी ४ वाजता आशिष रानडे यांचे गायन होऊन रात्री ९ वाजता श्रावणी तुळशीबाग वाले व समूहाचे भरतनाट्यम सादर झाले .

समर्थ सेवा मंडळाच्या वतीने श्रीधर कुटी येथे विविध कार्यक्रम संपन्न झाले. यामध्ये समर्थ पादुकांना सकाळी शोडशोपचार पूजा तसेच पवमान पंचसूक्त चा अभिषेक व महाआरती झाल्यावर महाप्रसाद वितरण करण्यात आला .



सातारा शहरातील समर्थ सेवा मंडळाच्या श्री समर्थ सदन सांस्कृतिक केंद्र येथेही समर्थांच्या मूर्तीची पूजा करून पादुकांचे पूजन ,पारंपारिक पध्दतीने सकाळी नामस्मरण, महापूजा, लघुरुद्र इ. धार्मिक कार्यक्रम करण्यात आले सध्या चातुर्मास उपक्रमांतर्गत येथे विविध मान्यवरांची कीर्तन प्रवचन व व्याख्यान सेवा सुरू आहे.

सातारा शहरातील शाहूपुरी येथील गजानन महाराज मंदिरात भक्त मंडळाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले .यामध्ये श्री गजानन विजय ग्रंथाचे वाचन तसेच ज्येष्ठ नागरिकांचा गुरुपौर्णिमेनिमित्त सत्कार करण्यात आला तसेच श्री गजानन महाराजांच्या मूर्तीवर सकाळी महाभिषेक आरती नामस्मरण करण्यात आले तसेच दुपारी महाआरती होऊन महाप्रसादाचे वितरण करण्यात आले .

सातारा जिल्ह्यातील श्री क्षेत्र सोळशी येथे शनेश्वर देवस्थानच्यावतीनेही नंद महाराजांच्या आश्रमात हा गुरुपौर्णिमेचा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला .गुरुपौर्णिमेनिमित्त पुसेगाव येथील श्री सेवागिरी महाराज मंदिरातही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये देवस्थानचे मठाधिपती सुंदरगिरी महाराज यांच्या हस्ते भाविकांना ब्रह्मलीन सिद्धहस्त योगी सद्गुरु सेवागिरी महाराजांचा अनुग्रह देण्यात आला. मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी रात्री उशिरापर्यंत गर्दी केली होती. सातारा जिल्हा नजीकच्या श्रीक्षेत्र नारायणपूर येथे दत्त मंदिर तसेच श्री अण्णा महाराज यांचे दर्शनासाठी भक्तांनी गर्दी केली होती.

सातारा शहरातील विविध मंदिरांमध्ये श्री स्वामी समर्थ मठ ,श्री श्रीधर स्वामी दत्त मंदिर समर्थ मंदिर परिसर तसेच श्री रामकृष्ण आश्रम समर्थ मंदिर येथेही विविध कार्यक्रमांचे गुरु पौर्णिमेनिमित्त आयोजन करण्यात आले होते .यामध्ये महापूजा, सत्संग, भजन सेवा ,सायंकाळी गुरु महिमा उपदेश व प्रसाद वितरण करण्यात आला .

..सातारा येथील समर्थ मंदिर परिसरातील श्रीरामकृष्ण आश्रमात गुरुपौर्णिमेनिमित्त केलेली विशेष पूजा ,तसेच श्री समर्थ सदन येथे समर्थ रामदास स्वामींच्या मूर्तीची केलेली विशेष पूजा व पादुकांची पूजा ,फोटो..अतुल देशपांडे, सातारा.

# नारायणगाव वरवाडी ग्राम बैठकीत भूमिपुत्राला आमदार करावे अशी मागणी

**नारायणगाव :** आगामी जुन्नर विधानसभा निवडणुकीमध्ये नारायणगाव व वारूळवाडी गावातील भूमिपुत्राला आमदार म्हणून विधानसभेवर निवडून आणण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी एक मुखाने दोन्ही गावांच्या ग्राम बैठकीत शिवसेनेचे ठाकरे गटाचे तालुका संघटक योगेश उर्फ बाबू पाटे यांना उमेदवारी मिळावी असा निर्णय बैठकीत घेतला आहे.

विद्यमान उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे यांनी विधानसभा निवडणुकीसाठी उभे राहावे अशी भूमिका घेत महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, ग्रामस्थ व पदाधिकाऱ्यांनी पाटे यांना जाहीर पाठिंबा व्यक्त केला. याप्रसंगी शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, काँग्रेस तसेच इतर सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने आज ग्रामदैवत श्री मुक्ताई मंदिरात उपस्थित होते.

याप्रसंगी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ पदाधिकारी व कृषिरत्न अनिल तात्या मेहेर, माजी पंचायत समिती सदस्य दिलीप कोल्हे, लोकनियुक्त महिला सरपंच डॉ शुभदा वाव्हळ, ग्रामोन्नती



**नारायणगाव वारूळवाडी ग्रामस्थांच्या ग्राम बैठकीत उपस्थित असलेले पदाधिकारी व ग्रामस्थ (छायाचित्र - किरण वाजगे)**

मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटे, वारूळवाडी चे सरपंच राजेंद्र मेहेर, ज्येष्ठ शिवसैनिक रशीद इनामदार, प्रवीण गुलाबराव डेरे, आशिष माळवदकर, एडवोकेट राजेंद्र कोल्हे, माजी सरपंच आत्माराम संते, संतोष वाजगे, एकनाथ शेटे, एमडी भुजबळ, डिके भुजबळ, उद्योजक तात्यासाहेब बोरकर, गणेश पाटे, जंगल कोल्हे, विकास तोडकरी, रमेश मेहेत्रे, निसार कुरेशी, ललित वारुळे, बी एस कोल्हे, हाजी कुरेशी, राजेंद्र कोल्हे, सचिन शेलोत, अजित वाजगे, हेमंत कोल्हे, आरिफ आतार, नंदू अडसरे, ईश्वर पाटे, गणेश दिवटे, विकास बाळसराफ, भाऊ पाटे, अमर वाजगे, महेंद्र खेबडे, भाऊसाहेब जोरी, दादाभाऊ खैरे तसेच विविध पतसंस्थांचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, महिला पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ग्राम बैठकीत शरद दरेकर, राहुल खेबडे, दीपक डेरे, निलेश गोरडे, रसिद्ध इनामदार, डी.के. भुजबळ, दिलीप कोल्हे, रमेश मेहेत्रे आदींनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांनी सर्वानुमते बाबू पाटे यांनी निवडणूक लढवावी असे मनोगत व्यक्त केले. आपणही ही विधानसभा निवडणूक लढवणार अशी घोषणा देखील यावेळी बाबू पाटे यांनी केली . कार्यक्रमाचे प्रास्तविक तंटामुक्तीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर औटी यांनी केले.


ताकद महाराष्ट्राची...
प्रत्येक माणसाची...
राष्ट्रवादी
मा.ना.श्री.
महाराष्ट्र राज्याचे भाग्यविधाते, राज्याचे उपमुख्यमंत्री
अजितदादा पवार
आपणांस जन्मदिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक : बारामती मधील तमाम अजितदादा प्रेमी

## क्राईम

### अपघात प्रकरणी कंटेनर चालकावर गुन्हा

**सातारा :** अपघात करून दुसऱ्या ट्रकचे नुकसान केल्याप्रकरणी कंटेनर चालकाविरुद्ध सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १९ रोजी दीड वाजण्याच्या सुमारास कोल्हापूर-पुणे महामार्गावर एमएच १४ केए १९८९ या ट्रकमध्ये बिघाड झाल्यामुळे तो रस्त्याच्या कडेला उभा असताना कंटेनर क्र. टीएन ०३ यु ३९७९ वरील चालक करुणानिधी आर याने ट्रकला पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात ट्रकचे सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार माने करीत आहेत.

### सुमारे सव्वादोन कोटींच्या फसवणूक प्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** सुमारे सव्वादोन कोटींच्या फसवणूक प्रकरणी तिघांविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २८ एप्रिल २०२३ ते ९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत संतोष गुलाबराव शिंदे रा. स्वरूप कॉलनी, सातारा यांचा विश्वास संपादन करून सोन्याच्या लिलावाच्या खरेदी विक्रीचे आमिष दाखवून शिरीष पाटील, सचिन जाधव (दोघेही रा. आष्टा ता. वाळवा जि. सांगली), मयूर मारुती फडके रा. कल्पतरू कॉलनी, जुना वारजे जकात नाका, कर्वेनगर, पुणे यांनी आरटीजीएस तसेच रोख स्वरूपात २ कोटी २७ लाख ९५ हजार रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडून फसवणूक केली. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक ढेरे करीत आहेत.

### राहत्या घरातून महिला बेपत्ता

**सातारा :** राहत्या घरातून एक महिला बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २० रोजी लिंब, ता. सातारा येथील राहत्या घरातून एक महिला बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार कुमठेकर करीत आहेत.

### जुगार अड्ड्यावरील छाप्यात दोघांवर कारवाई

**सातारा :** करंजे नाका येथील जुगार अड्ड्यावर शाहूपुरी पोलिसांनी छापा टाकून दोघांवर कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २० रोजी दुपारी साडेबारा वाजण्याची सुमारास करंजे नाका येथील रिक्षा स्टॉप शेजारील आडोशाला प्रशांत बाबुराव वायदंडे रा. आकाशवाणी केंद्र शेजारी, सातारा आणि मेहताब जब्बार शेख रा. केसरकर पेठ, सातारा हे दोघे जुगार घेताना आढळून आले. त्यांच्याकडून १२ हजार ३१० रुपये किंमतीचे जुगाराचे साहित्य तसेच एक कॉम्प्युटर हस्तगत करण्यात आला आहे.

### राजवाडा परिसरातून दुचाकीची चोरी

**सातारा :** राजवाडा परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १६ रोजी दुपारी दीड वाजण्याच्या दरम्यान विवेक कृष्णा भंडारे रा. भोंदवडे, पोस्ट गजवडी, ता. सातारा यांची वीस हजार रुपये किंमतीची दुचाकी क्रमांक एमएच ११ एएच ८५६९ अज्ञात चोरट्याने राजवाडा सातारा येथील राजधानी टॉवर्स येथून चोरून नेली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार खलिफा करीत आहेत.

# मराठा आरक्षण रॅली यशस्वी करण्याचा निर्धार

**सातारा :** मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची शनिवार, दि. १० ऑगस्ट रोजी सातारा येथे रॅली काढण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यातील प्रत्येक तालुका व गावनिहाय बैठका घेण्यात येणार आहे. सातारा येथील आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीला जिल्ह्यातील लाखो मराठा बांधवांच्या उपस्थितीत यशस्वी करण्याचा निर्धार रविवारी मराठा सेवक व आंदोलनकर्त्यांच्या बैठकीत करण्यात आला.



मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे शनिवार, दि. १० ऑगस्ट रोजी साताऱ्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीच्या नियोजनासाठी रविवारी संगमनगर येथील स्वराज्य सांस्कृतिक भवन येथे जिल्ह्यातील आयोजक, आंदोलनकर्ते, मराठा सेवकांची बैठक संपन्न झाली. त्यावेळी सर्वांनी एकमताने निर्धार केला. यावेळी प्रशांत निंबाळकर, राजेंद्र निकम, बाबा शिंदे, विवेक कुराडे- पाटील, डॉ. सत्यजीत पाटील, बाबा जाधव, शैलेंद्र भोईटे, हेमंत जाधव, राजेंद्र बर्गे, शिवाजी चव्हाण, विलासबाबा जवळ, डॉ विकास देशमुख, माऊली सावंत, सुवर्णा पाटील, राहुल शेडगे, जितेंद्र भोसले, अमोल पोळ, प्रमोद सस्ते, राहूल ताटे, सुभाष पवार, सोमनाथ पाटील बालाजी जगदाळे, राजेंद्र पाटील, अमोल घाडगे यांनी रॅली यशस्वी करण्यासाठी विविध सुचना करून प्रत्येक तालुक्यातून हजारोंच्या संख्येने मराठा बांधव उपस्थित राहतील असे सांगितले.

यावेळी सातारा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, पाटण, कराड, मायणी येथील मराठा सेवकांनी जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या गाव निहाय मराठा बांधवांच्या बैठका घेऊन जनजागृती करण्यात यावी, यासाठी मराठा बांधवांनी आपआपल्या भागाचा डेटा तयार करावा, रॅलीच्या नियोजनासाठी प्रत्येक तालुक्यातील दोन महिला व दोन मराठा सेवकांची कोअर कमिटी स्थापन करण्यात यावी. तसेच पार्किंग, वैद्यकीय सुविधा, पाणीवाटप यासह अन्य सुविधांच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कमिटी करण्यात यावी. यासह नियोजनाबाबत मत व्यक्त करण्यात आले. दरम्यान, मराठा सेवक अरूण काकडे यांनी आरक्षण व शांतता रॅलीसाठी सायकलवरून जिल्ह्यात प्रबोधन यात्रा काढणार असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक विवेकानंद बाबर, डॉ. सत्यजित पाटील यांनी केले. स्वागत राजेंद्र बर्गे यांनी केले.

आभार बापू क्षिरसागर यांनी मानले. मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाला सातारा येथील बैठकीत पाठिंबा देण्यात आला. तर मराठा- कुणबी दाखला देताना जात पडताळणीचे पुरावे दाखल करूनही समाजकल्याण विभागातील जातपडताळणी अधिकारी जाणीवपूर्वक मराठा -कुणबी दाखले अपात्र करीत असल्याच्या तक्रारी मराठा बांधवांनी केली. याबाबत पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या समवेत बैठक घेण्याच्या सूचना उपस्थितांनी केल्या.

## झेडपीच्या शाळांमध्ये शिक्षण सप्ताहाचे आयोजन



**सातारा :** राष्ट्रीय शिक्षण धोरण अंतर्गत २२ ते २८ जुलै या कालावधीत शाळांमध्ये शिक्षण सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताहात अध्ययन-अध्यापन साहित्य दिवस, क्रीडा, सांस्कृतिक दिवस यासह विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी शबमन मुजावर यांनी दिली.

शिक्षण व विकासाच्या विविध पैलूंचा समावेश असणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण तज्ञ, पालक यांचा समन्वय वाढणार आहे. शैक्षणिक उपक्रम सात दिवस साजरा होणार असून, प्रामुख्याने पर्यावरणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होणार आहे. या उपक्रमात शिक्षण तज्ञ, विद्यार्थी, पालकांना सहभागी करुन घेण्यात येणार आहे. हा उपक्रम २२ जुलै रोजी अध्ययन-अध्यापन साहित्य दिवस, २३ जुलै मुलभूत, संख्याज्ञान व साक्षरता दिवस, २४ जुलै क्रीडा दिवस, २५ जुलै सांस्कृतिक दिवस, २६ जुलै कौशल्य व डिजिटल उपक्रम, २७ जुलै मिशन लाईफच्या दृष्टीकोनातून ईको क्लब उपक्रम व शालेय पोषण दिवस, २८ जुलै रोजी समुदाय सहभाग दिवस उपक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व सरकारी शाळा, खासगी शाळांमध्ये हा शैक्षणिक सप्ताह राबविण्याबाबत सर्व शाळांना सूचना देण्यात आल्याची माहिती शबनम मुजावर यांनी दिली.

## राहाता तालुक्यातील विद्यार्थी गणवेशाच्या प्रतिक्षेत

**अहमदनगर :** शाळा सुरू होऊन एक महिना उलटला तरी देखील राहाता तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश मिळाला नसल्यामुळे विद्यार्थ्यांना गणवेश विना शाळेत जावे लागत असून जिल्हा परिषदेत शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभाराबाबत पालकांमध्ये नाराजीचे सूर दिसून येत आहे. १५ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यासाठी शाळेची घंटा वाजली. जिल्हा परिषद शाळेत जाणारे बहुदा विद्यार्थी हे सर्व सामान्य कुटुंबातील आहेत. त्यामुळे राज्य सरकारने जिल्हा परिषद शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना मोफत गणवेश बूट व दररोज पोषण आहार देण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत.

मागील वर्षापर्यंत शालेय विद्यार्थ्यांना गणवेश व बूट देण्याची जबाबदारी ही शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापकांची होती. तेव्हा शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी दिला जात होता. काही कारणास्तव शिक्षकांकडून गणवेश देण्यासाठी एक दिवस जरी उशीर झाला तर लगेच जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावली जायची. यावर्षी शाळा सुरू होऊन एक महिना झाला असताना देखील विद्यार्थ्यांना अद्याप गणवेश मिळाला नाही याला जबाबदार कोण? गणवेश देण्यास उशीर झाल्याबद्दल राज्य शासन आता कोणावर कारवाई करणार असा प्रश्न पालकांमध्ये उपस्थित केला जात आहे.

जिल्ह्यात विविध तालुक्यात विद्यार्थ्यांना गणवेश देण्याचे काम सुरू आहे मात्र राहाता तालुक्यात अद्याप कुठल्याही जि. प. शाळेत विद्यार्थ्यांना गणवेश दिले गेले नाही. शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासूनच इतर शाळेतील विद्यार्थी गणवेशात शाळेत जातात, परंतु अद्याप आपल्याला गणवेश नाही हे पाहून जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांचा हिरमोड होतो. अनेक विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी शाळेत सूट-बूटमध्ये जावे याची उत्कंठा असते. मात्र राज्य शासन शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे विद्यार्थ्यांना शाळा सुरू होऊन एक महिना झाला तरी अद्याप गणेश मिळाले नाही. त्यामुळे गणवेश मिळणार कधी याची प्रतीक्षा विद्यार्थ्यांबरोबर पालकांना देखील लागली आहे.

# नाशिक जिल्ह्यात डेंग्यू रूग्णसंख्या ४७४ वर

**नाशिक :** जिल्ह्यात वाढत्या डेंग्यू आजार प्रतिबंध व नियंत्रणासाठी सर्व आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने मोहीम स्तरावर उपाययोजना कराव्यात, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी आज दिल्या. संदर्भ रूग्णालय येथे डेंग्यू आजाराबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी महानगरपालिका आयुक्त डॉ. अशोक करंजकर, जिल्हा परिषदचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे. मनपा अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे, उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ डॉ. कपिल आहेर, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल नेहते, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. सुनीता पीळवदकर, अतिरिक्त जिल्हा शल्याचिकीत्सक डॉ. निलेश पाटील, वैद्यकीय अधिकारी संदर्भ सेवा डॉ.अरुण पवार, मनपा आरोग्य अधिकारी डॉ.तानाजी चव्हाण, अतिरीक्त सहसंचालक मलेरिया विभाग डॉ. विवेक खतगावकर यांच्यासह आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना पालकमंत्री भुसे म्हणाले की, जिल्ह्यात डेंग्यू रूग्णसंख्या ४७४ वर पोहचली असून ही वाढती संख्या लक्षात घेता, यास वेळीच प्रतिबंध व नियंत्रण करणे ही सर्व आरोग्य यंत्रणांची सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी डासांची उत्पत्तीस्थाने शोधून ती तात्काळ नष्ट करणे आवश्यक आहे.डेंग्यूच्या निदानासाठी प्राथमिक चाचणीसाठी आवश्यक असणाऱ्या तपासणी किट, औषधे, गोळ्या व इतर आरोग्य सुविधांची कमतरता भासणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी. तसेच हा औषधांचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून ठेवावा. शहरासह ग्रामीण पातळीवरही या उपाययोजना राबविण्यात याव्यात. लोकसंख्येच्या घनतेनुसार आवश्यक ठिकाणी सकाळी व सायंकाळी या दोन्ही वेळेत औषध व धुर फवारणी करण्याच्या सूचनाही यावेळी भुसे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना बैठकीत दिल्या.

तसेच डेंग्यू आजाराबाबत मोहीम स्तरावर नागरिकांमध्ये (उळींळूशप) जनजागृती होणे आवश्यक आहे. यासाठी आरोग्य विभागासह शिक्षण विभागानेही ही जबाबदारी पार पाडावयाची आहे. जनजागृतीसाठी फ्लेक्स, स्थानिक केबल वाहिन्यांवरून माहितीपर स्क्रोल, तसेच आकाशवाणीवरून प्रबोधनपर जिंगल्स यांचा वापर प्रभावी ठरेल, असा विश्वास पालकमंत्री दादा भुसे यांनी यावेळी व्यक्त केला. याशिवाय डेंग्यु आजाराच्या निर्मूलनासाठी आरोग्य अधिकारी यांनी स्वच्छता कर्मचारी यांच्यामार्फत विशेष ड्राईव्ह राबवावा. यासाठी प तयार करावा. लोकेशन ट्रेस केल्यास कर्मचारी नेमून दिलेल्या ठिकाणी अधिक जबाबदारीने काम करतील. या कामात कोणत्याही प्रकारची हयगय होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश पालकमंत्री दादाजी भुसे यांनी उपस्थित अधिकारी यांना दिले.

त्याचप्रमाणे नाशिक व मालेगाव येथे चाचणी लॅबसाठी आठवडाभरात प्रस्ताव पाठविण्यात यावेत. शहरातील सिडको व नाशिकरोड तसेच ग्रामीण भागात दिंडोरी व निफाड भागात रूग्णसंख्या अधिक असल्याने याठिकाणी स्वतंत्र कक्ष उभारण्यात यावेत, अशा सूचनाही पालकमंत्री दादा भुसे यांनी बैठकीत दिल्या. तसेच आवश्यकतेनुसार फवारणीसाठी शेतकऱ्यांना आवाहन केल्यास त्यांच्याकडून फवारणीसाठी मिनी टॅक्टर उपलब्ध होवू शकतील, असेही मंत्री दादा भुसे यांनी सूचित केले. यावेळी पालकमंत्री दादा भुसे यांनी संदर्भ रूग्णालयातील इतर आरोग्य सेवाविषयक बाबींचाही आढावा घेतला.

### इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदी सविता खैरे

**नारायणगाव :** नारायणगाव शहर इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदी सविता अरुण खैरे यांची तर सचिव पदी प्रीती प्रशांत शहा यांची एकमताने निवड करण्यात आली.

यानिमित्ताने आयोजित केलेला पदग्रहण समारंभ डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉक्टर शोभना पालेकर यांच्या उपस्थितीत नारायणगाव येथे नुकताच पार पडला. इनरव्हील क्लब नारायणगाव च्या उपाध्यक्षपदी रश्मी थोरवे, खजिनदारपदी ज्योती सोमवंशी, आयएसओ रुचिता वाघ आणि एडिटर अंजली खैरे, खझझ (आय.पी.पी.) सुजाता भुजबळ, तर उडउउ (सी.एल.सी.सी.) या पदासाठी डॉक्टर प्रीती खैरे यांची निवड करण्यात आली. या पदग्रहण समारंभात इनरव्हील क्लब डिस्ट्रिक ३१३ च्या अध्यक्षा डॉक्टर शोभना पालेकर यांनी क्लबचे व सभासदांच्या उत्कृष्ट कामगिरीचे ही कौतुक केले.मावळत्या अध्यक्षा प्रीती शहा यांनी सर्व मेंबर्स ना छान गिफ्ट दिले आणि सहकारी सदस्यांना ट्रॉफी देवून सन्मानित केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला समृद्धी वाजगे यांनी स्वागत गीत सादर केले. नव निर्वाचित अध्यक्षांनी देखील सर्वांना गिफ्ट देवून खूष केले.

एडिटर अंजली खैरे यांनी त्यांचे महिन्याचे बुलेटिन यावेळी प्रकाशित केले.

# रायगडात सावित्री नदीने धोका पातळी ओलांडली

## कुंडलिका नदी इशारा पातळीवर; महाड, रोहा परिसराला पुराचा धोका



**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. सावित्री नदीने धोका पातळी ओलांडली आहे. तर कुंडलिका नदी इशारा पातळीच्या वर वाहत आहेत. त्यामुळे महाड आणि रोहा शहरांना पुराचा धोका निर्माण झाला आहे.

महाबळेश्वर आणि पोलादपूरच्या खोऱ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सावित्री नदीच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. महाबळेश्वर परिसरात रविवारी सकाळी आठ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासात १५९ मिलीमिटर पावसाची नोंद झाली. तर पोलादपूर येथे १३४ मिमी, महाड येथे १४५ मिमी पावसाची नोंद झाली. रविवारी दिवसभर या परिसरात पावसाचा जोर कायम होता. त्यामुळे सावित्री नदीने दुपारी २ च्या सुमारास इशारा पातळी ओलांडली. सायंकाळी ५ वाजता ती ६.५० मीटरची धोका पातळी गाठली. त्यामुळे महाड शहराला पुराचा धोका निर्माण झाला आहे. शहरात पुराचे पाणी कुठल्याही क्षणी शिरण्यास सुरुवात होणार आहे. त्यामुळे महाड शहर आणि लगतच्या परिसराला सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. एनडीआरएफची एक तुकडी या ठिकाणी तैनात करण्यात आली आहे.

भिरा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने डोलवाहल बंधारा येथे कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. नदी २३ मीटरच्या इशारापातळीवरून वाहत असल्याने, रोहा शहर आणि त्यालगत असलेल्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला. पौर्णिमा असल्याने आज रात्री समुद्राला मोठी भरती येणार आहे. अशात पावासाचा जोर कायम राहिल्यास नदीच्या पाण्यात मोठा फुगवटा तयार होऊ शकणार आहे. जिल्ह्यात सर्वत्र पावसाचा जोर कायम आहे. त्यामुळे पाताळगंगा, आंबा आणि उल्हास नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली होती. अलिबाग, तळा, पेण आणि महाड येथे घरांची पडझड झाली आहे.

# विक्रीसाठी आणलेल्या १० तलवारी जप्त, तरुणाला अटक

**सांगली :** सांगली-आष्टा मार्गावर दुचाकीवरून तलवारी विक्री करण्यासाठी आलेल्या तरुणाला सांगली शहर पोलिसांनी अटक करून १० तलवारी हस्तगत केल्या. त्याला अधिक चौकशीसाठी न्यायालयाने सोमवारपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.



कृष्णा नदीलगत एक व्यक्ती संशयास्पदरित्या वावरत असल्याची माहिती सांगली शहर पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे भगतसिंग विक्रमसिंग शिख (वय २१ रा. जुना कुपवाड रोड) याला ताब्यात घेऊन झडती घेतली. त्याच्याजवळील दुचाकीवर असलेल्या काळ्या पोत्यात दहा तलवारी मिळाल्या. या तलवारींची विक्री करण्याच्या प्रयत्नात तो होता. या तलवारींची किंमत ६५ हजार रुपये आहे. या तलवारी कोठून आणल्या, व कोणाला विकणार होता याची माहिती घेण्यासाठी त्याला न्यायालयात हजर करून पोलीस कस्टडीची मागणी पोलिसांच्यावतीने करण्यात आली. न्यायालयाने त्याला दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# पालकमंत्र्यांवर बोलायची आपली पात्रता आहे का..?

## पं स. सदस्य सुरेश पानस्कर यांची हर्षद कदम यांच्या वर टिका

**पाटण :** उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख हर्षद उर्फ भानूप्रताप कदम यांच्या कडून सतत पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांच्या वरती राजकीय व वैयक्तिक टिका सुरू आहेत. स्वतःच्या गावच्या ग्रामपंचायत निवडणूकीत यांना स्वतःच्या वार्ड मधले सदस्य निवडून आणता आले नाहीत त्यांची पालकमंत्र्यांवर टिका करायची पात्रता नाही अशा शब्दांत पालकमंत्री शंभुराज देसाई यांचे समर्थक व पाटण पंचायत समिती सदस्य सुरेश पानस्कर यांनी शिवसेना ( ठाकरे) गटाचे



सातारा जिल्हाप्रमुख हर्षद कदम यांच्यावर जोरदार टीकास्त्र डागले आहे.

पाटण येथील शिवदौलत बँक येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी बोलताना सुरेश पानस्कर म्हणाले, लोकसभेची निवडणूक झाल्यानंतर उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख हर्षद कदम पुन्हा डोके वर काढून पुन्हा पुन्हा पालकमंत्री ना शंभुराज देसाई यांच्या वर टीकाटिप्पणी करत आहेत. जिल्हाप्रमुख असले तरी त्यांची पात्रता, उंची नाही की त्यांनी पालकमंत्री यांच्या वरती बोलावे. जिल्हा परिषद निवडणुकीत आमच्या गटाच्या विजय पवारांनी प्रचंड मताधिक्याने तुम्हाला पराभूत केले. स्वतः त्या वॉर्ड मधील उमेदवार तुम्ही निवडून आणू शकला नाही. वेळोवेळी तुम्हाला तुमची जागा लोकांनी दाखवली आहे. लोकांच्या संपर्कात नसेला जिल्हाप्रमुख मुंबई व्हाया मल्हारपेठ फिरत असतात. मात्र आमचे नेते नामदार शुभुराज देसाई व त्यांचे बंधू, सुपूत्र व संपूर्ण कुटुंबच जनतेच्या सेवेसाठी चोवीस तास कार्यरत असतेय ,

> **मल्हारपेठ ग्रामपंचायत निवडणूकीत तुमच्या पत्नीस एक उच्च शिक्षित महिला म्हणून सरपंच पदासाठी लोकांनी निवडून दिले. एक दोन वर्ष काम पाहिले नंतर सगळा कारभार घरातून केला. मल्हारपेठ मध्ये काय विकास केला . यापुढे पालकमंत्री यांच्या विरोधात सतत बोलत राहिला तर त्याचं भाषेत तुम्हाला उत्तर दिले जाईल असा इशारा शेवटी सुरेश पानस्कर यांनी हर्षद कदम यांना दिला आहे .**

गद्दार म्हणून सतत हिनवत राहता. गद्दारी कोणी कुठे केली हे तपासा. काही वर्षापूर्वी मल्हारपेठ ग्रामपंचायत निवडणूक लढवत असताना राष्ट्रवादी सोबत संधान साधून शिवसेनेची सत्ता मल्हारपेठ मध्ये घालवलीत . तेव्हा कुठे तुमची कट्टर निष्ठा गेली होती. त्यावेळी शिवसेनेशी गद्दारी कोणी केला. मुंबई मध्ये असले की सच्चा शिवसैनिक आणि गावाला सोईचा पक्ष ही भूमिका आतापर्यंत तुमची होती. तुमचे मेळावे फ्लॉप होत आहेत. मुंबईचा मेळावा लोकांअभावी पार पडला.